SONI Since 1965
TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या
पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २०.११.२०२६ | अंक नं. १९४ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी



लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ

साई मिडास टच,
नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02



92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले
खास आपल्या लाडक्या
लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

कमी ऐकू येते का ?



signia
Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
15% Discount
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या • स्पीच थेरपी

स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
मुख्य शाखा : कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहिल्यानगर. मो. 83800 41240
शाखा नं. १ : शॉप नं. १५, डी.पी. रोड, शिवतारा गार्डन, गणेश सोसायटी, चैतन्यनगर, कोथरुड, पुणे. मो. 9028075405
शाखा नं. २ : शॉप नं. १०, सुर्यप्रभा गार्डन सोसायटी, लाईट हाऊस समोर, विश्रवेवाडी, पुणे.
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

पंधरा दिवसात गाळे खाली करा; महानगरपालिकेने दिल्या नोटीसा

नगर – नगर शहरातील गंज बाजार येथील महापालिकेच्या मालकीच्या शॉपिंग सेंटर मधील गाळेधारकांना नोटीस बजावून पंधरा दिवसात गाळे खाली करण्याचे आदेश महापालिकेच्या वतीने देण्यात आले आहेत. गाळे खाली करून न दिल्यास हे गाळे ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे या नोटीसांमध्ये म्हटले आहे.

गंज बाजार येथे महापालिकेचे शॉपिंग सेंटर आहे. महापालिकेने या सेंटरमधील गाळे आणि ओटे व्यावसायिकांना भाडेकरारावर दिलेले होते. त्यातील सर्वांचे भाडेकरार संपलेले असून नव्याने करारनामा करण्यात आलेले नाहीत. तसेच या शॉपिंग सेंटरचीही दुरावस्था झाली आहे त्यामुळे



गंज बाजारतील महापालिकेचे गाळे (छाया : धनेश कटारिया)

येथे नवीन शॉपिंग सेंटर उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, येथील व्यवसायिकांचे भाडे कराराची मुदत संपलेली असल्यामुळे नोटिसा बजावून हे गाळे आणि ओटे खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. व्यावसायिकांना दिलेल्या नोटिसामध्ये म्हटले आहे कि, महापालिकेच्या मालकीचे गंज बाजार शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांची भाडे पद्धतीची मुदत १५ ऑक्टोबर १९९७ रोजीच संपलेली आहे त्यामुळे आपण सदर गाळ्यांचे अनधिकृतपणे वापर करीत असल्याने निदर्शनास येत आहे. तसेच आपणावर संदर्भ क्रमांक दोन अन्वये महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम ८१ ब ची नोटीस बजावण्यात आली आहे. पंधरा दिवसात गाळे खाली करा. मुदतीत गाळे खाली न करुन दिल्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम ८१ ब दोन नुसार सदरच्या गाळा ताब्यात घेण्याबाबत कारवाई करण्यात येईल. सदरच्या नोटीसांमुळे संबंधीत गाळेधारक अडचणीत आले आहेत.

फ्रेश स्टॉक
महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे
खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच
कृपया मॉलला भेट द्यावी.
जेन्टस-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर,
हँड ग्लोज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात..
सरसकट २०% डिस्काऊंट..



आली थंडी
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या.
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

An ISO 9001:2015 Certified
DiSHA
COMPUTER INSTITUTE



Become a
COMPUTER
PROFESSIONAL
Enroll Now
www.dishagroup.in

PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT

DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM

दिल्ली गेट शाखा — आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. 9371051769
जुने बस स्टँड शाखा — अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर. 9371151769
पाईपलाईन शाखा — रुचा गार्डन बिल्डिंग, मिसलवाला चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर 7447761769



आम्हाला अत्यंत आनंद होत आहे की इकोझ्रोन (Ecozen) द्वारे
शासनाच्या सहकार्याने सोलर रूफटॉप कॅम्पचे आयोजन करण्यात येत आहे.
जे जनसेवेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.
हा कॅम्प PM सूर्य घर मोफत वीज योजने अंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना सोलर रूफटॉप सिस्टीमबद्दल संपूर्ण माहिती देईल, जेणेकरून लोकांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल.
आपण या कार्यक्रमास आपली सन्माननीय उपस्थिती दर्शवल्यास आम्हाला अभिमान वाटेल.



प्रमुख पाहुणे
मा.श्री. संग्रामभैय्या जगताप
आमदार, अहिल्यानगर शहर

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती
श्री.गणेश भोसले नगरसेवक | श्री.प्रकाश भागानगरे नगरसेवक | श्री.संजय चोपडा चेअरमन,अहिल्यानगर मर्चंट्स बँक | श्री.भगवान फुलसौंदर माजी महापौर

आपल्या मार्गदर्शनाने आणि उपस्थितीने हा कार्यक्रम अधिक प्रभावी आणि जनहितकारी बनेल.
आम्ही आपल्या स्नेहपूर्ण संमतीची प्रतीक्षा करू.
आपले नम्र,
इकोझेन टीम

२२ नोव्हेंबर २०२६
दुपारी ३.०० ते रात्री ८.००
संजोग लॉन्स ॲण्ड बँक्वेट
राजपालजवळ, डॉन बॉस्को एरिया, अहिल्यानगर, महाराष्ट्र ४१४००३

INDIA'S NO.1 भारतातील नं.१ सर्वात विश्वासार्ह रुफटॉप सोलर
SMART SOLAR
पी एम सूर्य घर
मोफत वीज योजनेंतर्गत
Building a
Smart + Sustainable
Future with
DeepTech
+919271046194
vishal mate

सुवर्ण महोत्सव 50
सुवर्ण महोत्सवाकडून
वाटचाल अमृत प्रवासाकडे...
औद्योगिकरणाची प्रगती व्हावी
अधिक समृध्दीकडे...



यासाठी आमच्या अ.नगर मर्चन्टस् बँकेने
सतत साथ दिली.
ती अधिक वृध्दीगंत व्हावी
या शुभकामना !
मर्चन्टस् बँकेचे संस्थापक
मा.श्री. हस्तीमलजी मुनोत,
चेअरमन मा. संजयजी चोपडा
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाचे
अभिनंदन व शुभेच्छा !

सभासदांना रु. ५१००/- भेट पावती देण्यासाठी
होणाऱ्या सोहळ्यास आमच्याही शुभकामना !
इंदानी परिवार
आयडीयल स्टील ग्रुप
GENUUNE STEEL SOLUTION UNDER ONE ROOF
एम.आय.डी.सी., अहिल्यानगर

राजेंद्र शुक्रे
प्रिसिजन
इंजिनिअरिंग वर्क्स
Precision Components,
Dies, Moulds & Accessories
L-184 एम.आय.डी.सी., अहिल्यानगर

संजय बंदिष्टी
निर्मिती
इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस प्रा. लि.
I Shaft Keys I Fabricated Shells
I Motor & Alternator Shafts
I CNC Components I Alternator Components
L-212 , एम.आय.डी.सी., अहिल्यानगर.
Dishan

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन – २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

मोटारसायकलला कट मारल्याच्या वादातून बेदम मारहाण; चौघांविरोधात गुन्हा दाखल

नगर – मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरून एका व्यक्तीला चौघांनी बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्ञैनी गावच्या वेशीसमोर १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत बाळासाहेब बन्सी मोरे (वय ३८ वर्षे, रा. पिंपळगाव उज्ञैनी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे गावच्या वेशीसमोर असताना आरोपी हरी गायकवाड, प्रेम हरी गायकवाड, रोहीत आल्हाट आणि मनोज आल्हाट (सर्व रा. पिंपळगाव उज्ञैनी, ता.नगर) यांनी त्यांना गाठले. तू मोटारसायकलवरून माझ्या गाडीला कट का मारलास, असा जाब विचारत आरोपींनी वाद घातला.

या वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन चौघांनी लोखंडी पाईप, लाकडी काठी आणि दांडक्याचा वापर करून फिर्यादीच्या पाठीवर, डाव्या हाताच्या दंडावर तसेच दोन्ही पायांच्या मांडीवर मारहाण केली.या हल्ल्यात बाळासाहेब मोरे हे जखमी झाले आहेत. मारहाणीसोबतच आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर १९ नोव्हेंबर रोजी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांच्या विरुद्ध बीएनएस कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) प्रमाणे हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल खेडकर हे करीत आहेत.

'महाराजस्व अभियान'च्या सदस्यपदी भाजपचे भानुदास बेरड यांची नियुक्ती



नगर – छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा क्र. १ या अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावी, लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने दहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्या आहेत. त्यामध्ये अहिल्यानगर भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रा. भानुदास बेरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये संजय कौडगे (नांदेड), अरविंद पाटील निलंगेकर (निलंगा जि. लातूर), नितीनकुमार भुतडा (जुनी गुजरी, जि. यवतमाळ), संजय गाते (पुलगाव जि. वर्धा), वासुदेव काळे (पाटस रोड जि. पुणे), जगदीश मुळीक (पुणे), प्रकाश निकम (मुखडा जि. पालघर), परशुराम ढेकणे (रत्नागिरी), भानुदास बेरड (अहिल्यानगर) आणि बबनराव चौधरी (धुळे) यांचा समावेश आहे.

सावेडी परिसरात भरदुपारच्या वेळी चोरट्यांचा धुमाकूळ; ३ वाहनांच्या काचा फोडून लाखो रुपयांचा ऐवज लंपास

नगर – सावेडी परिसरात नगर–मनमाड रोड, ट्रेंडस मॉल आणि तारडे हॉस्पिटल परिसरात चोरट्यांनी १९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ३.३० वाजेच्या दरम्यान चांगलाच धुमाकूळ घातला. तीन वाहनांच्या काचा फोडून चोरट्यांनी २ लाखांच्या रोकडसह सुमारे ३ लाख १५ हजारांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नागेश भुजंगराव शिंगणे (वय ६०, मूळ रा. बोरीवली, मुंबई) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे जेवणासाठी मित्रांसोबत हॉटेलमध्ये गेले होते. त्यांची मारुती सुझुकी कंपनीची व्हिक्टोरियस कार (क्र. २६ बीएच ८२१२ बी) ही नगर मनमाड रोडच्या कडेला दामोदर बियाणी हॉटेलसमोर पार्क केलेली होती. जेवण करून परत आल्यावर त्यांना कारच्या मागील डाव्या बाजूची काच फोडून लॅपटॉप, चार्जर आणि औषधे असलेली बॅग चोरीला गेल्याचे आढळले.

चोरी गेलेल्या एमआय लॅपटॉपची किंमत २५ हजार रुपये आहे. त्यामुळे ते तक्रार देण्यासाठी तोफखाना पोलीस ठाण्यात गेल्यावर अन्य दोन वाहनचोरीच्या घटनांची माहिती समोर आली. यामध्ये सावेडीतील ट्रेंड्स मॉलसमोर उभ्या असलेल्या डॉ. सचिन काशिनाथ पानसरे यांच्या किया कारची (क्र.एमएच १७ डीसी १८४८) डाव्या बाजूची काच फोडण्यात आली. त्यांच्या कारमधून बॅगसह २ लाख रुपये रोख आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरट्यांनी लांबवली.

तसेच तिसऱ्या घटनेत तारडे हॉस्पिटलसमोर पार्क केलेल्या महेश रामदास गवळी यांच्या किआ कॅरेन्स कारची (क्र.एमएच १६ डीएस२३३४) उजवी काच फोडण्यात आली.त्यांच्या कारमधील चार बॅगा चोरून नेत ५० हजार रुपये रोख आणि ४० हजार रुपयांचे हॉस्पिटल साहित्य असा ९० हजारांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.

या तिन्ही घटनांमध्ये मिळून एकूण ३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल आणि रोख रक्कम चोरीला गेली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलीस पथकाने घटनास्थळी भेट देत परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत चोरट्यांचा शोध सुरु केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश चव्हाण हे करत आहेत.

प्राचार्या अनुरिता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार



नगर – निमगाव वाघा येथील धर्मवीर ग्रामीण वाचनालयाच्या वतीने २४ नोव्हेंबर रोजी नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा होणार आहे. या कार्यक्रमात महिला अत्याचार विरोधी कार्य करणारे, महिला संरक्षण, समुपदेशन व अत्याचारा विरोधी लढण्यासाठी महिलांमध्ये धाडस निर्माण करणाऱ्या व्याख्यात्या मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक पै. नाना डोंगरे यांनी दिली आहे.

या सोहळ्याचे वितरण माजी जिल्हा परिषद सदस्या राणी लंके यांच्या हस्ते करण्यात येणार असून माजी जि.प.सदस्य माधवराव लामखडे, साहित्यिक सीए शंकर अंदानी, पुणे येथील लेखिका प्रा.अश्विनी काळे उपस्थित राहणार आहेत. प्रा. झगडे यांना विविध पुरस्कारांनी सन्मान करण्यात आले आहे. त्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार, जागतिक महिला दिनानिमित्त लोकमत गौरव पुरस्कार, आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार असे विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

भरदिवसा घरफोड्या, वाहन चोरीच्या घटनांमध्ये होतेय वाढ; सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

भाजप नगरसेवकांची महापौर, आयुक्तांकडे मागणी; काही ठिकाणी स्वखर्चातून बसविणार



सावेडी उपनगरातील महापालिका प्रभाग क्रमांक सहामध्ये घरफोड्या आणि वाहनचोरीच्या घटनांबाबत महापौर सौ. ज्योतीताई गाडे व महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना देताना भाजपचे नगरसेवक करण कराळे, मनोज दुल्लम, पुष्कर कुलकर्णी आदी. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – सावेडी उपनगरातील महापालिका प्रभाग क्रमांक सहामध्ये घरफोड्या आणि वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भरदिवसा घरांमधील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम चोरीला जाण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रभागातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी भाजपचे नगरसेवक करण कराळे, मनोज दुल्लम आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक सहामध्ये अनेक वसाहती, रहिवासी परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणे आहेत. या परिसरात नागरिकांची सतत वर्दळ असते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिसरात घरफोडी आणि वाहनचोरीच्या घटना वारंवार घडत आहेत. नागरिकांच्या घरातील मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. विशेषतः भरदिवसा घरफोड्या होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

नगरसेवक करण कराळे यांनी या घटनांबाबत चिंता व्यक्त करत परिसरात परराज्यातील संशयितांकडून चोऱ्यांचे प्रकार सुरू असल्याचे सांगितले. अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रभागातील महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

नगरसेवक पुष्कर कुलकर्णी म्हणाले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक सहामध्ये तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्यामुळे चोरीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यास मदत होईल. परिसरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवता येईल. तसेच चोरी, अपघात आणि इतर अनुचित घटना घडल्यास संबंधितांचा शोध घेण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजचा उपयोग होईल. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ठिकाणी नगरसेवक स्वखर्चातूनही सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रभागातील प्रमुख चौक, अंतर्गत रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची ठिकाणे निश्चित करावीत. जिल्हा नियोजन समितीकडून महापालिकेला प्राप्त होणाऱ्या निधीतून हे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यास चोरीच्या घटनांना आळा बसण्यासह नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत होणार आहे.

शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर चॉपर व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला

मंगलगेट परिसरातील घटना, भाजपा नगरसेवकाच्या भावासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शिवसेना शिंदे गटाचे माजी अहिल्यानगर शहर प्रमुख आणि महापालिका स्थायी समितीचे माजी सभापती सचिन तुकाराम जाधव (वय ४८, रा. किंगगेट, रामचंद्र खुंट, अहिल्यानगर) यांच्यावर मंगलगेट परिसरातील भांडकर गॅरेजसमोर मध्यरात्री पांढऱ्या कारमधून आलेल्या चौघांनी चॉपर व लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी पहाटे १२.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात सचिन जाधव गंभीर जखमी झाले असून या प्रकरणी भाजपा नगरसेवकाच्या भावासह चौघांच्या विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सचिन जाधव यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी जाधव हे १८ नोव्हेंबर रोजी रात्री नातेवाईक प्रशांत बापू काळे यांच्या मच्छीमार्केटशेजारील मंगलगेट येथील जागरण गोंधळाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. रात्री जेवण व आरती झाल्यानंतर १९ नोव्हेंबर रोजी पहाटे १२.४५ वाजण्याच्या सुमारास ते सचिन राऊत, स्वप्निल बेद्रे आणि वाजिद शेख यांच्यासोबत कार्यक्रमाच्या ठिकाणाहून बाहेर पडले.

त्यावेळी सचिन जाधव यांनी सचिन राऊत यांना मोटारसायकल घेऊन ऑफिसजवळ जाण्यास सांगितले व ते इतरांसोबत पायी निघाले. भांडकर गॅरेजसमोर आले असताना समोरून वेगाने एक पांढऱ्या रंगाची कार आली आणि त्यातून ४ जण खाली उतरले. त्यातील आरोपी श्रीकांत उर्फ सनी मुर्तडकर याने 'सागर भाऊने सांगितले आज याला मारून टाका' असे म्हणत अंगावर धावून आले. यावेळी प्रथमेश उर्फ बांग्या थोरात आणि श्रीकांत उर्फ सनी मुर्तडकर यांनी कारच्या डिकीतून लोखंडी रॉड व चॉपर काढून जाधव यांच्यावर हल्ला केला.

त्यांनी बचावासाठी डावा हात पुढे केल्यावर डाव्या हाताच्या पंजावर मार लागला, तर गोपाल विनोद मालपाणी यानेही लोखंडी रॉडने मारहाण सुरू केली. श्रीकांत उर्फ सनी मुर्तडकर याने धारदार चॉपरने डाव्या डोळ्यावर वार केल्याने रक्तस्राव होऊन जाधव जमिनीवर कोसळले. त्यानंतर चौघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असता सोडवण्यासाठी आलेल्या प्रशांत काळे तसेच अन्य दोघांनाही आरोपींनी मारहाण केली.

या प्रकार पाहून कार्यक्रमातील नागरिक धावून आले. त्यावेळी श्रीकांत उर्फ सनी मुर्तडकर, प्रथमेश उर्फ बांग्या थोरात, गोपाल विनोद मालपाणी (सर्व रा. वंजारगल्ली, अहिल्यानगर) आणि चिकू खरपुडे हे तेथून पसार झाले. जखमी सचिन जाधव यांना सचिन राऊत यांनी मोटारसायकलवरून साईदीप हॉस्पिटल येथे नेले; तेथे सिटीस्कॅन केल्यानंतर पुढील उपचारांसाठी डॉ. सादिक (हातमपुरा) यांच्या हॉस्पिटलमध्ये नेऊन डोळ्यावर टाके टाकण्यात आले. सकाळी युनायटेड सिटी हॉस्पिटल (कोठला) येथे रेफर केल्यानंतर तेथे स्थलांतराचे काम सुरू असल्याने एक तासात डिस्चार्ज घेऊन ते सध्या साईदीप हॉस्पिटल मध्ये उपचार घेत आहेत.

या प्रकरणी सचिन जाधव यांनी दिलेल्या जबाबावरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार पो.हे.कॉ. गंगावणे करत आहेत.

चोरीच्या गुन्ह्यात फिर्यादीच निघाला आरोपी

फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे गमावल्याने बनाव रचल्याचे तपासात झाले उघड



नगर – केडगाव उपनगरातील मराठा नगर येथील तानाजी मालुसरे अपार्टमेंट मध्ये झालेल्या १ लाख २५ हजार रुपयांच्या घरफोडीचा गुन्हा पोलिसांनी अवघ्या चार तासांत उघडकीस आणला असून, धक्कादायक बाब म्हणजे या गुन्ह्यातील फिर्यादीच आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे हरल्याने त्याने चोरीचा बनाव रचल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांनी फिर्यादीलाच अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.१५ वाजेपासून ते १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान मराठा नगर येथील तानाजी मालुसरे अपार्टमेंट अज्ञात चोरट्याने फ्लॅटच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून १ लाख २५ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची फिर्याद आदर्श ज्ञानदेव तनपुरे (वय २५ वर्षे) याने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार अज्ञात इसमाविरुद्ध १८ नोव्हेंबर रोजी दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी तपासाची सूत्रे गुन्हे शोध पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस यांच्याकडे देण्यात आली होती.

त्यानुसार स.पो.नि. चिटणीस व गुन्हे शोध पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच श्वान पथक, फिंगरप्रिंट आणि फॉरेन्सिक युनिटच्या माध्यमातून घटनास्थळाची पाहणी केली. तपासादरम्यान फिर्यादी आदर्श तनपुरे यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या तसेच ते ऑनलाईन फॉरेक्स ट्रेडिंग करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून त्यांना विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली.

आई दिवाळी सणानिमित्त माहेरी गेल्यानंतर घरात असलेली १ लाख २५ हजार रुपयांची रोख रक्कम थोडी थोडी करून त्याने आपल्या एचडीएफसी बँक खात्यावर भरली आणि पुढे 'एक्सएम' डीमॅट खात्यावर फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्याचे त्याने कबूल केले. या ट्रेडिंगमध्ये आपले नुकसान झाले असून, त्याबाबत घरच्यांना कोणतीही माहिती न देता त्याने घरफोडीचा बनाव रचल्याचे तपासात समोर आले.

पोलिसांनी एचडीएफसी बँकेकडून खाते विवरण प्राप्त केले असता त्यात त्याने रक्कम जमा केल्याचे दिसून आले तसेच त्याचा मोबाईल जप्त करून तपासणी केली असता त्यातही एक्सएम डीमॅट खात्याचे तपशील आढळून आले. हा गुन्हा फिर्यादीनेच केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली असून, न्यायालयाने त्याला २१ नोव्हेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कारवाई पो.नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.विशाल चिटणीस, उपनिरीक्षक दीपक मेढे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, साबीर शेख, विनोद बोरगे, विशाल दळवी, संदीप शिरसाठ, सत्यजित शिंदे, सूरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, रमेश शिंदे, अतुल लाटे, संकेत धिवर, वैभव काळे व आकाश काळे यांच्या पथकाने केली आहे.

पत्रकार राजेंद्र त्रिमुखे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नगर शहरातील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र शामसुंदर त्रिमुखे (वय ५६, रा. भिंगार) यांचे २० नोव्हेंबर रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सकाळी भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. पत्रकार त्रिमुखे यांनी गेली अनेक वर्षे विविध वृत वाहिन्यासाठी तसेच वृत्तपत्रांसाठी वार्ताकनाचे काम केले.

निवृत्ती देसाई यांचे दु:खद निधन



नगर – सोनेवाडी (ता.नगर) येथील रहिवासी निवृत्ती गंगाराम देसाई (नाना) (वय ७६) यांचे १९ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोनेवाडी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना असा परिवार आहे. नितीन व बाळासाहेब देसाई यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

बीएसएनएल कार्यालयातून ४५ हजारांच्या कॉपर केबलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील शिंदे मळा परिसरातील जैन स्थानक, महावीरनगर येथील बीएसएनएल एक्सचेंजच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयातून अज्ञात चोरट्याने ४५ हजार रुपये किमतीची कॉपर केबल कापून चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. ही घटना १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजल्यापासून ते १८ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

याप्रकरणी कनिष्ठ दूरसंचार अधिकारी नरेंद्र रामसकल यादव (वय ४४, रा. बीएसएनएल स्टाफ क्वार्टर, नवलेनगर, सावेडी, अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी नरेंद्र यादव हे ऑक्टोबर २०२६ पासून बीएसएनएलच्या शिंदे मळा येथील कार्यालयाचा पदभार सांभाळत आहेत.

या कार्यालयात तपोवन रोड, सावेडी येथील सुभाष काशिनाथ काचोळे हे गेल्या १५ ते २० वर्षांपासून कंत्राटी तत्त्वावर काम करत आहेत. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत सुभाष काचोळे हे नेहमीप्रमाणे कर्तव्य बजावून आपल्या घरी निघून गेले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १८ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता ते पुन्हा कामावर हजर झाले.त्यावेळी त्यांना कार्यालयाच्या दरवाजाचे कुलूप तोडलेले आढळून आले. तसेच कार्यालयाच्या परिसरात केबल आणि इतर साहित्याची उचकापाचक झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

चोरी झाल्याचा संशय आल्याने सुभाष काचोळे यांनी कार्यालयाच्या मागील बाजूला पाहणी केली असता कॉपरची केबल कापून चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. यानंतर त्यांनी तात्काळ दूरध्वनीवरून ही माहिती कनिष्ठ दूरसंचार अधिकारी नरेंद्र यादव यांना कळवली. माहिती मिळताच नरेंद्र यादव हे सहकारी प्रवीण रामचंद्र सोनवणे यांच्यासह घटनास्थळी पोहोचले आणि पाहणी करून चोरीची खात्री केली.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ४५ हजार रुपये किमतीची निळ्या व लाल रंगाची २४० मिमी आकाराची प्रत्येकी पाच ते सात मीटर लांबीची दोन डीसी सप्लाय कॉपर केबल समाविष्ट आहेत. याशिवाय प्रत्येकी अंदाजे दहा ते पंधरा मीटर लांबीच्या २०० पेअर काळ्या रंगाच्या दोन कॉपर केबल आणि ४०० पेअर काळ्या रंगाच्या दोन कॉपर केबल असा एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. या प्रकरणी नरेंद्र यादव यांच्या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मेव्हण्यानेच केला मेव्हण्याच्या डोक्यात दगड घालून खून; अपघाताचा बनाव रचून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

नगर – बहिणीला दारू पिऊन त्रास देत असल्याच्या करणातून मेव्हण्यानेच बहिणीच्या नवऱ्याचा डोक्यात दगड घालून खून केला, त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पुलाखाली टाकून अपघाताचा बनाव रचण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना नगर तालुक्यातील रतडगावच्या शिवारात घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुभाष बाबासाहेब जगताप (वय ३५, रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी युवराज अंबादास जगताप (वय २८, मूळ रा. रतडगाव, सध्या रा. केडगाव, ता. जि. अहिल्यानगर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी मयताच्या पत्नीचा भाऊ अमोल सोपान जाधव (रा. रतडगाव, ता. जि. अहिल्यानगर) या आरोपीविरुद्ध खुनाचा आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास रतडगाव शिवारातील इनरकॉन कंपनीच्या कार्यालयाजवळ बाभळीच्या झाडाखाली घडली. आरोपीने आपल्या बहिणीचा नवरा सुभाष जगताप हा दारू पिऊन बहिणीला त्रास देत असल्याच्या करणातून त्यांच्या डोक्यात दगड घालून त्यांना जीवे ठार मारल्याचे पोलिसांनी सांगितले. खून केल्यानंतर प्रकारावर पांघरूण घालण्यासाठी आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह रतडगाव येथील पुलाखाली नेऊन टाकण्यात आला. या प्रकाराबाबत पोलिसांना संशय आल्याने त्यांनी सर्व बाजूंनी तपास केला असता हा खुनाचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर फिर्यादीने १९ नोव्हेंबर रोजी फिर्याद दिल्यानंतर नगर तालुका पोलीस ठाण्यात रात्री उशिरा आरोपी अमोल जाधव याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३ (१) आणि २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे यांच्यासह पथकाने घटनास्थळी भेट दिली. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहेत.

गृहिणी

आरोग्य

धूळ व प्रदूषणापासून बचाव

धूळ आणि प्रदूषणापासून बचाव करणे ही आजच्या काळाची मोठी गरज झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळी हवेत धूळ अधिक असते म्हणून त्या वेळी बाहेर जाणे टाळणे चांगले असते. बाहेर जावे लागलेच तर तोंडावर स्वच्छ कापड किंवा मुखवटा बांधावा. डोळ्यांना धूळ लागू नये म्हणून चष्मा घालावा. घरी परत आल्यावर हात पाय तोंड स्वच्छ पाण्याने धुवावेत. कपडे झटकून बाहेरच ठेवावेत आणि घरात आणू नयेत. घरातील फरशी ओल्या फडक्याने पुसावी म्हणजे धूळ उडत नाही. खिडक्या आणि दारे धूळ येण्याच्या वेळी बंद ठेवावीत. श्वासाच्या त्रासापासून वाचण्यासाठी घरात तुळस कोरफड किंवा इतर हिरवी झाडे लावावीत. या झाडांमुळे हवा स्वच्छ होण्यास मदत होते. जेवणात हिरव्या पालेभाज्या फळे दूध आणि ताक यांचा समावेश करावा. भरपूर पाणी प्यावे म्हणजे शरीरातील घाण बाहेर पडण्यास मदत होते. धूर होणाऱ्या गोष्टी घरात कमी जाळाव्यात. कचरा जाळू नये. शेणाच्या गोवऱ्या किंवा लाकडे जाळताना धूर कमी होईल याची काळजी घ्यावी. रस्त्यावर थुंकू नये आणि कचरा टाकू नये. लहान मुले म्हातारी माणसे आणि आजारी माणसे यांनी धुळीपासून अधिक जपावे. त्यांना सकाळच्या धुक्यात आणि धुळीत बाहेर पाठवू नये. घराबाहेर खेळताना मुलांच्या तोंडावर कापड बांधावे. रोज सकाळी कोमट पाण्याने गुळण्या कराव्यात. नाकातून श्वास घ्यावा आणि तोंडातून श्वास सोडावा. यामुळे छाती मोकळी राहते. घराच्या आजूबाजूला झाडे लावावीत आणि त्यांना पाणी घालावे. सर्वांनी मिळून परिसर स्वच्छ ठेवला तर धूळ आणि प्रदूषण खूप कमी होईल.

पाककला

मक्याची खमंग भाजी

साहित्य : मक्याचे दाणे २ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ मध्यम, बारीक चिरलेला टोमॅटो १, बारीक चिरलेली हिरवी मिरची २, किसलेले आले १/२ चमचा, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, हिंग चिमूटभर, हळद १/४ चमचा, लाल तिखट १/२ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, मीठ चवीनुसार, साखर १/२ चमचा, लिंबाचा रस १ चमचा, तेल २ चमचे, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

कृती : मक्याचे दाणे थोडेसे मीठ घालून उकडून घ्या. कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे आणि हिंग घाला. मोहरी तडतडल्यावर त्यात कांदा घालून गुलाबी रंग येईपर्यंत परता. त्यात आले, हिरवी मिरची आणि टोमॅटो घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात हळद, लाल तिखट आणि गरम मसाला घालून एकजीव करा. उकडलेले मक्याचे दाणे, मीठ आणि साखर घालून चांगले मिसळा. झाकण ठेवून मंद आचेवर ५ मिनिटे शिजवा. गॅस बंद करून त्यावर लिंबाचा रस आणि कोथिंबीर घाला. तयार भाजी गरम गरम पोळी किंवा भाकरीबरोबर सर्व्ह करा.

वास्तू

शौचालयासाठी योग्य दिशा

घरातील शौचालय किंवा बाथरूम चुकूनही ईशान्य कोपऱ्यात किंवा स्वयंपाकघराला लागून असू नये. यासाठी सर्वात योग्य दिशा वायव्य किंवा नैऋत्य आहे. शौचालयात नेहमी निळ्या रंगाची बादली ठेवावी. आणि दरवाजा नेहमी बंद ठेवावा.

सौंदर्य

तुळशीच्या पानांचा रस चेहऱ्यावर लावल्याने मुरुमे बरे होतात.

सल्ला

* लसूण लवकर सोलण्यासाठी १० सेकंद गरम पाण्यात टाका. * हाताला हळद लागल्यास बटाट्याने घासा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६

भागवत एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, उ.भा.०६।५१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस मिश्र फलदायी राहील.

वृषभ : तब्येत बिघडण्याची आणि खर्च वाढण्याची शक्यता आहे.

मिथुन : आजचा दिवस आनंददायी राहील. कुटुंबीयांसोबत वेळ घालवाल.

कर्क : आज व्यापार-व्यवसायात फायदा होईल.

सिंह : आजचा दिवस नवनिर्माण आणि कलेसाठी उत्तम राहील.

कन्या : आजचा दिवस प्रतिकूलतेचा राहील. मन चिंतीत राहील.

तूळ : दिवस आनंदात जाईल. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळेल.

वृश्चिक : आज कौटुंबिक वातावरणात तणाव जाणवेल.

धनु : आज ठरवलेली सर्व कामे पूर्ण होतील.

मकर : आज मन अस्वस्थ राहील. मागील उधारी वसुल होईल.

कुंभ : आज मिळणाऱ्या फायद्यामुळे आनंद द्विगुणित होईल.

मीन : आजचा दिवस शुभ फलदायी राहील. नोकरी-व्यवसायात यश मिळेल.

* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

सुविचार : जिंकणे म्हणजे नेहमी पुढे जाणे नव्हे, तर आपल्यापेक्षा पुढे गेलेल्या माणसाला मागे न खेचणे म्हणजे जिंकणे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

सापाला पाय नसताना तो पळतो कसा?

सापाला पाय नसताना तो चालतो कसा हा प्रश्न अनेकांना पडतो, कारण आपल्याला चालणे म्हणजे पाय टाकून पुढे जाणे एवढेच माहित असते. पण निसर्गाने सापाला पाय दिले नाहीत तरी त्याला चालण्यासाठी लागणारी सर्वात प्रगत यंत्रणा त्याच्या शरीरातच दिली आहे. सापाचे संपूर्ण शरीर हेच त्याचे इंजिन, त्याची चाके आणि त्याचे ब्रेक आहे. याचे पहिले रहस्य त्याच्या हाडांच्या रचनेत आहे. माणसाच्या पाठीत जेमतेम तेहतीस मणके असतात, तर सापाच्या शरीरात अडिचशे ते चारशेहून अधिक मणके असतात. प्रत्येक दोन मण्यांमध्ये लवचिक सांधे आणि मजबूत स्नायूंचे जाळे असते. यामुळे त्याचे शरीर कोणत्याही दिशेला अत्यंत सहजपणे वाकू शकते.

दुसरे रहस्य त्याच्या पोटाखालच्या खवल्यांम ध्ये आहे. आपण वरून पाहतो ते लहान चमकदार खवले वेगळे आणि पोटाखाली असलेले रुंद, आयताकृती आणि खरबरीत कडा असलेले खवले वेगळे असतात. यांना व्हेंट्रल स्केल्स म्हणतात. हे खवले जमिनीला नखाप्रमाणे घट्ट पकडतात. साप जेव्हा पुढे सरकतो तेव्हा हे खवले मागच्या दिशेने ताठ होतात आणि जमिनीवर अडकून बसतात, त्यामुळे शरीर मागे घसरण्याऐवजी पुढे ढकलले जाते. जर हे खवले नसते तर तो बर्फावर पडलेल्या माणसासारखा जागेवरच घसरत राहिला असता. आता तो पुढे जातो कसा तर तो चार वेगवेगळ्या पद्धती वापरतो आणि गरजेनुसार पद्धत बदलतो. पहिली आणि सगळ्यात जास्त वापरली जाणारी पद्धत म्हणजे नागमोडी चाल किंवा लॅटरल अंड्युलेशन. यात साप आपल्या शरीराचे अनेक एस आकाराचे वळण तयार करतो. प्रत्येक वळणाचा बाहेरचा भाग एखाद्या दगडाला, झाडाच्या मुळाला किंवा जमिनीच्या उंचवट्याला दाब देतो. न्यूटनच्या तिसऱ्या नियमानुसार प्रत्येक क्रियेला समान आणि विरुद्ध प्रतिक्रिया असते, त्यामुळे जमीन त्याला विरुद्ध दिशेने ढकलते आणि तो वेगाने पुढे जातो. म्हणूनच गुळगुळीत काचेवर किंवा फरशीवर सापाला चालता येत नाही, कारण तिथे दाब देण्यासाठी आधारच मिळत नाही.

दुसरी पद्धत म्हणजे सरळ रेषेत चालणे किंवा रेक्टिलिनिअर लोकोमोशन. ही पद्धत मोठे अजगर, घोणस यांसारखे जड शरीराचे साप वापरतात. यात शरीर वळण घेत नाही. पोटाखालचे खवले आणि त्यांना जोडलेले स्नायू एका लहरीसारखे काम करतात. आधी पुढच्या भागाचे खवले पुढे सरकतात आणि जमिनीला पकडतात, मग मधले आणि मग मागचे. पाहणाऱ्याला वाटते की साप सरळ रेषेत हळू हळू सरकतो आहे, पण आतमध्ये त्याचे खवले मिलिपीडच्या पायांसारखे एकापाठोपाठ एक पुढे सरकत असतात. शिकार करताना आवाज न करता जवळ जाण्यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त आहे.

तिसरी पद्धत म्हणजे बाजूला सरकणे किंवा साइडवाइंडिंग. ही वाळवंटातील सापांची खासियत आहे. वाळूवर सरळ चालण्याचा प्रयत्न केला तर वाळू घसरते. म्हणून साप आपले डोके एका बाजूला तिरके फेकतो, शरीराचा मधला भाग उचलून पुढे टाकतो आणि मग शेपटी ओढून घेतो. यामुळे वाळूवर त्याच्या खुणाही तुटक तुटक आणि तिरक्या रेषेत उमटतात. ही पद्धत वाळूत घसरणे टाळते आणि शरीराचा कमीत कमी भाग गरम वाळूला टेकतो.चौथी पद्धत म्हणजे एकॉर्डियन किंवा कॉन्सर्टिना पद्धत. जेव्हा सापाला एखाद्या अरुंद बिळात किंवा झाडाच्या फांदीवरून चढायचे असते तेव्हा तो ही पद्धत वापरतो.

तो शरीराचा पुढचा भाग लांब करून पुढे टाकतो, तिथे शरीराला घट्ट वेटोळे घालून आधार घेतो आणि मग मागचा आखडलेला भाग ओढून पुढे आणतो. जसे एकॉर्डियन वाद्य आकुंचन आणि प्रसरण पावते तशी ही क्रिया दिसते.म्हणजेच साप चालत नाही तर पोहतो. जसा मासा पाण्यात लहरी निर्माण करून पोहतो, तसा साप जमिनीवर लहरी निर्माण करून पोहतो. त्याच्यासाठी जमीन हेच पाणी आहे. त्याचे मणके, त्याचे हजारो स्नायू आणि पोटाखालचे खरबरीत खवले यांचा एकत्रित समन्वय हाच त्याचा अदृश्य पाय आहे, म्हणूनच बिनपायाचा असूनही तो पाय असलेल्या अनेक प्राण्यांपेक्षा अधिक वेगाने आणि अधिक चपळतेने धावू शकतो.

क्षमेचे महत्त्व

एका नगरात एक प्रसिद्ध मूर्तिकार राहत होता, त्याचे नाव होते – शिवा. त्याचा एकच शिष्य होता विनय. शिवाने विनयला आपल्या मुलाप्रमाणे सर्व कला शिकवल्या. एके दिवशी राजाच्या दरबारातून शिवाला मोठी मूर्ती बनवण्याची मागणी आली. शिवाने रात्रंदिवस मेहनत करून संगमरवरी दगडातून अतिशय सुंदर मूर्ती घडवली. उद्या मूर्ती राजाला द्यायची होती. रात्री शिवा थकून झोपला. विनयला वाटले, गुरूंना मदत करावी म्हणून त्याने मूर्तीला अंतिम झिलई लावायला घेतली. पण त्याच्या हातून हत्यार घसरले आणि मूर्तीच्या हाताचे बोट तुटले.

सकाळी शिवाने पाहिले आणि त्याचा संताप अनावर झाला. वर्षभराची मेहनत वाया गेली असे वाटून त्याने रागात विनयला आश्रमाबाहेर काढले. विनय काहीच न बोलता निघून गेला. तो दुसऱ्या गावी गेला, पण त्याने मूर्तिकला सोडली नाही. तो दिवस-रात्र मेहनत करू लागला.

पाच वर्षांनी त्याच नगरात राजाने पुन्हा एका मोठ्या मंदिरासाठी मूर्तिकारांना बोलावले. अनेक मूर्तिकार आले, त्यात शिवा आणि विनय दोघेही होते. राजासमोर सर्व मूर्ती मांडल्या. राजाने विनयने बनवलेल्या मूर्तीकडे बोट दाखवून सांगितले की ही सर्वात सुंदर आहे. ही मूर्ती निवडली गेली. त्यावेळी विनय पुढे आला आणि म्हणाला, महाराज, ही मूर्ती सुंदर आहे कारण हिचा खरा निर्माता माझे गुरु शिवा आहेत. त्यांनीच मला घडवले आहे. पाच वर्षांपूर्वी माझ्या एका चुकीमुळे त्यांच्या मूर्तीचे बोट तुटले होते, म्हणूनच मी या मूर्तीला मुद्दाम तुटक्या बोटासह बनवले आहे, जेणेकरून मला माझी चूक नेहमी आठवत राहील. हे ऐकून शिवाचे डोळे पाणावले.

तो धावत जाऊन विनयला मिठी मारली आणि म्हणाला, बाळा, चूक तुझी नव्हती, चूक माझी होती. मी रागाच्या भरात तुला क्षमा करू शकलो नाही. जर मी त्याच दिवशी तुला क्षमा केली असती तर आपली पाच वर्षे वाया गेली नसती.राजा आणि सगळे दरबारी हे दृश्य पाहून भारावून गेले. शिवाने त्याच क्षणी विनयला क्षमा केली आणि विनयनेही गुरूंचा राग मनात न ठेवता त्यांना क्षमा केली.

तात्पर्य : चुका प्रत्येकाकडूनच होतात, पण जो मनाचा मोठेपणा दाखवून दुसऱ्याला क्षमा करतो तोच खरा मोठा असतो. क्षमा केल्याने नाते तुटत नाही तर अधिक घट्ट होते.



आत्मशक्ति

त्या पर्वत शिखरावर एका क्षणात उड्डाण करावयाचे ठरविले तर आपण निराश होऊन हतबल होऊ. कारण हे एक अशक्य साध्य आहे. निराश होऊन ते सोडण्यापेक्षा एक एक पाऊल पुढे टाकणेच योग्य होय. तेव्हाच आपण प्रगती करीत आहोत असे लक्षात येईल. हे सारे काही लक्षात येण्यापूर्वीच आम्हाला एक दिवस असे दिसेल की आम्ही बऱ्याचशा दोषांना घालविले आहे. तर बघा, की दोषांची समीक्षा करताना आपली स्थिती काय आहे? आपल्या स्वतःच्या प्रामाणिकपणाचे परीक्षण करा. जर आम्ही आपल्या चुकांवर पांघरूण घातले तर अशा करण्याने आमचेच

अध्यात्मिक शक्ती

नुकसान होईल. आपल्या दोषांकडे डोळेझाक केली तर आपण आपल्या प्रगतीचा वेग मंद करतो. जेवढ्या प्रामाणिकपणे स्वतःकडे बघू तेवढ्या वेगाने आम्ही आमच्या चुका दूर करु शकू.

क्रोध शांत करणेआम्हास असे वाटते की आम च्या विचारांना कोणी जाणत नाही. पण ह्या विचारांचे तरंग उठतात व सूक्ष्म पातळीवर ते समजून येऊ शकतात. याबाबत एक उदाहरण पाहू.एकदा काळी हिंदुस्थानच्या बादशहा अकबरला बिरबलाने स्वतः च्या विचारांच्या परिणामाबाबत सावध केले. त्याने सांगितले की विचार फार बलशाली असतात. ते समजून घेण्यासाठी आपण एक प्रयोग करू या! काय आपण रस्त्यावरून चालत येत असलेल्या त्या माणसाला पाहू शकता? जसा तो जवळ येईल तसे आपण त्याबद्दल रागीट विचार मनात आणा. त्याचा काय परिणाम होतो ते पाहू. राजाने त्या अनोळखी माणसाकडे बघत विचार केला की, ह्या नवागत म णसाची मारझोड केली पाहिजे! तो माणूस जवळ आल्यावर अकबरांनी त्याला विचारले, आपण मला पाहिल्यावर काय विचार केला?त्या माणसाने उत्तर केले, माफ करा महाराज! आपणांस पाहिल्याबरोबर आपणास मारझोड करून आपले डोके फोडावे असे मला वाटले. येथे कोणतेही शब्द बोलले गेले नाहीत किंवा कोणतीही क्रिया केली गेली नाही.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

शब्दगंध क्र. ७५५९ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) जिल्ह्याचा किंवा वाड्याचा मुख्य अधिकारी (पूर्वीच्या काळातील) ४) प्रत्यक्ष; देखत; पुढ्यात ७) वनस्पती ८) अस्थिर; दोलायमान ९) एक पक्षी; कावळा; काग १०) सुरुवात; प्रणाम; वंदन; प्रारंभ १२) आशय; हेतू १४) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू १५) नेहमी; हमेशा १६) मध्य प्रदेशातील एक प्रसिद्ध शहर १८) मुस्लिम वर्षाचा सातवा महिना २०) सुनील गावसकर यांचे टोपणनाव २१) एक जंगली प्राणी; रानरेडा २३) पेन्सिलीने ज्यावर लिहितात तो दगडाचा पातळ चौकोनी तुकडा; टोपली २४) हुंगण्याचा एक पदार्थ; तपकीर २५) ज्याअर्थी; 'तर'चा जोडीदार २६) वाकलेला; झुकलेला

उभे शब्द :- १) प्रवास; लांबवर फिरायला जाणे किंवा सहल २) संशय; साल; वर्ष; सन; संदेह ३) एक प्रकारचा दगड ४) समजून घेणारा; शहाणा ५) लाकडाचा भारा ६) गुंग; मग्न; लीन; रममाण ९) करंजीसारखा एक गोड खाद्यपदार्थ ११) मदत करणारा; सहायक १२) त्वचेवरील काळा डगा; चामखीळ; तीळ १३) जास्त प्रमाण असलेले (तेलाचा वगैरे पदार्थ) १६) जीभ; जिव्हा; वाणी; एक पेय १७) फळातील रसाळ भाग; गर १९) पूर्वेकडील एक प्रगत देश २२) आठवड्यातील कोणताही दिवस; आघात; घाव

शब्दगंध क्र. ७५५८ चे उत्तर

दे	वे	गौ	डा	■	क्ष	त्रि	य
व	ग	र	■	घ	ण	■	क्ष
ता	■	व	च	न	भं	ग	■
■	ग	■	क	■	गु	र	व
अ	र	व	ली	■	र	■	ज
व	ज	न	■	पा	■	दा	न
ता	■	रा	खी	व	■	■	दा
र	मी	ज	■	न	वे	त	र

फिल्मीचक्कर क्र. १२६२ चे उत्तर

क्या	य	ही	प्या	र	है	■	प
■	■	र	■	ख	■	सा	ल
■	रों	■	स	था	ल	■	दो
पा	की	जा	■	ला	■	■	प
पा	■	■	ह	■	■	ता	ल
क	हा	नी	कि	स्म	त	की	■
ह	■	ले	क	■	नु	■	रा
ते	रे	■	त	■	जा	न	म

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

एक क्षण असा आला की तो म्हणाला, आता हे सगळं मी एकटा एकहाती करू शकत नाही. पण जसजशी सुनावणीची तारीख जवळ आली तसं त्याने पुन्हा सगळं हाताळायला सुरुवात केली आणि बाकीचे सगळे कुटुंबीय नेहमीप्रमाणे निश्चिंत होते.

शिवानीदीदी : असं घडणारच होतं. कारण त्या आत्म्यांबरोबर पूर्वी झालेल्या ऊर्जेच्या देवाण-घेवाणीनुसार त्याचं नशीब ठरलं आहे. या आयुष्यात, त्याच्याशी संबंध आलेले आत्मे आराम करतील आणि त्याला खूप कष्ट पडतील हे त्याच्याच पूर्वकर्माने ठरवलं आहे. हे कोणीही बदलू शकत

नाती घट्ट विणू या

नाही.

सुरेश ओबेरॉय :

जेव्हा मी अशा परिस्थितीतून जातो तेव्हा माझ्या मनात इतरांबद्दल नकारात्मक विचार येतात. 'माझ्या कष्टांची ते दखलही घेत नाहीत आणि वर मलाच प्रश्न विचारतात.' ती परिस्थिती समाप्त होते तरीसुद्धा ते नकारात्मक विचार मनात घुटमळत राहतात.

शिवानीदीदी : आपण हे समजून घ्यायची गरज आहे की, आपण जी काही चांगली कर्म करतो ती आपल्या सकारात्मक संस्कारांनुसार आणि इतर आत्म्यांबरोबर असलेल्या पूर्व कार्मिक खात्यानुसार करतो. जर बाकीचे टीका करत असतील तर ते त्यांच्या संस्कारांनुसार आणि कार्मिक खात्यानुसार करतात. पण वर्तमानात, आपण अशा परिस्थितीत कसे वागतो तेही आपलं कर्मच आहे. ही जाणीव असणं हाच त्या कर्माला सकारात्मकतेत बदलण्याचा मार्ग आहे.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर : तुला काय त्रास आहे ?

पेशंट : सगळे मला वेडा समजतात.

डॉक्टर : कोण सगळे ?

पेशंट : तुम्ही आधी माझे ५०० रुपये द्या, मग सांगतो

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात सर्वाधिक देश कोणत्या खंडात आहेत?

- आफ्रिका खंडात

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१) पहिला महिना : पहिल्या महिन्यामध्ये पुरुषबीज व स्त्रीबीज यांचा संयोग होऊन त्यात जीवात्म्याचा प्रवेश होतो. या काळामध्ये खालील औषधे उपयुक्त पडतात.

१) यष्टीमधु - म्हणजेच ज्येष्ठमध. हे आपल्या शरीरामध्ये विषद्रव्याची निर्मिती होऊ देत नाही.

२) लताकरंज (सागरबीज) - हे गर्भस्थापना करण्यास मदत करते.

३) देवदारु - गर्भस्थापनेमधील अडचणींना प्रतिबंध करते.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

दुसरा महिना : या महिन्यामध्ये गर्भ हा घन स्वरूपात असतो.

१) अश्मांतक - हे गर्भवतीच्या शरीरातील दूषित घटक काढून टाकते.

२) मंजिष्ठा - मंजिष्ठा हे गर्भिणीचे रक्तशुद्धी करण्याचे काम करते.

३) शतावरी - गर्भिणीच्या शरीरास पोषक असणारे घटक शतावरीतून मिळतात; त्यामुळे गर्भपात होण्याचा धोका टळतो.

तिसरा महिना : या महिन्यामध्ये गर्भाचे अवयव तयार व्हायला लागतात.

१) क्षीरकाकोली : गर्भिणी व गर्भ या दोघांमध्ये रस रक्तपुरवठा व्यवस्थित होण्यासाठी क्षीरकाकोली उपयुक्त ठरते.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

नियोजनबद्ध विकास कामातून विकसित शहराकडे वाटचाल

आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; प्रभाग क्रमांक १३ मधील टिळक रोड ते नवीन टिळक रोड कामगार भवन रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

नगर – शहरातील विविध क्षेत्रांतील विकासकामे नियोजनबद्ध पद्धतीने आणि कायमस्वरूपी स्वरूपात मार्गी लागावीत, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील विविध विकासकामांना गती मिळत असून, अहिल्यानगर शहर विकसित शहराच्या दिशेने वाटचाल करीत आहे. या विकासकामांमुळे शहराच्या सौंदर्यातही भर पडत आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



प्रभाग क्रमांक १३ मधील टिळक रोड ते नवीन टिळक रोड कामगार भवन रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. (छायाचित्र : लहू दळवी)

शहरातील विविध चौकांमध्ये आकर्षक शिल्प उभारण्याचे काम सुरू असून, डीपी रस्त्यांपासून थेट कॉलनी परिसरातील रस्त्यांची कामेही मार्गी लागत आहेत. मूलभूत सुविधांच्या प्रश्नांपासून विकासकामांना प्राधान्य देण्यात आले असून, नागरिकांकडूनही या कामांचे स्वागत केले जात आहे. दोन्ही टिळक रोडला जोडणाऱ्या कामगार भवन रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतर या परिसराला अधिक सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होईल. नागरिकांनीही आपला परिसर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रभाग क्रमांक १३ मधील टिळक रोड ते नवीन टिळक रोडला जोडणाऱ्या कामगार भवन रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. नगरसेविका सुजाता पडोळे यांच्या पाठपुराव्याला आणि आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांना यश आले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर मार्ग मिळाला आहे. प्रभागातील चारही नगरसेवकांनी निवडणुकीच्या वेळी नागरिकांना दिलेल्या विकासकामांच्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक सुरेश बनसोडे, नगरसेविका सुजाता पडोळे, अनिता शेटीया, गोरख पडोळे, माजी नगरसेवक विपुल शेटीया, अजित जगताप, संदीप लोया, कुलकर्णी, वैद्य, कडूस, पवार, गोरक्ष पडोळे, सचिन दळवी, संतोष बांगर, अनिल कानडे, निलेश पडोळे, रोहित पडोळे, कांती पटेल, तुषार पटेल, राजू एकाडे, शरद कोके, अतुल जाधव, राजाभाऊ कानडे, बाबू पाचारणे, रितेश सोनिमंडलेचा, प्रीतम तोडकर, अक्षय गाडळकर, विकी कानडे, सिद्धांत जाधव, वंदनाताई पडोळे, कल्पनाताई पडोळे, जाधवताई, कारखलेताई, हंसराज पटेल, मनोज लाटे, संतोष टेके आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

अविनाश घुले म्हणाले की, आमदार जगताप यांनी प्रभागाच्या विकासासाठी कधीही निधी कमी पडू दिला नाही. विकासकामांसाठी शासनाकडे सुमारे साडेचारशे कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला असून, लवकरच निधी प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. या निधीतून प्रभागातील १३ रस्त्यांची कामे मार्गी लागणार आहेत. कापड बाजारातील रस्त्याचे काम वेगाने पूर्ण करून व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी तसेच नागरिकांना दळणवळणासाठी चांगला रस्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचबरोबर विद्युत तारा भूमिगत करण्याचे काम करण्यात आल्याने परिसराला अधिक सुटसुटीत आणि सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे, असे घुले यांनी सांगितले.

नगरसेविका सुजाता पडोळे म्हणाल्या की, महापालिका निवडणुकीच्या वेळी प्रभागातील नागरिकांना चारही नगरसेवकांनी विकासकामांची आश्वासने दिली होती. त्यानुसार आता टप्प्याटप्प्याने वचनपूर्तीचे काम सुरू आहे. या विकासकामांसाठी आमदार जगताप यांचे योगदान लाभत आहे. अनेक वर्षांपासून कामगार भवन रस्त्याचे काम प्रलंबित होते. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे काम आता मार्गी लागले आहे. यापूर्वी राज पॅलेस रस्त्याचे कामही पूर्ण करण्यात आले आहे. दोन्ही टिळक रोडला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे पूर्णत्वाकडे जात असल्यामुळे परिसरातील दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. विकासकामांमुळे वाडिया पार्क परिसरालाही सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे आणि माजी नगरसेवक विपुल शेटीया यांनी मनोगत व्यक्त केले. गोरख पडोळे यांनी आभार मानले.

प्रेरणादायी अक्षरधन

तूच कारण तुझ्या बंधनाला

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर आष्टीकर लिखीत

नंदादीप

प्रतिभा ९८९०९५६६९५

एकदा स्वामीजींकडे एक तरुण आला. तो म्हणाला; स्वामीजी, इच्छा, वासना आणि कामना यांनी करकचून बांधले आहे. माझ्या मनाला. त्या सोडत नाहीत. तुम्ही काही उपाय करा ना. त्याने योगवसिष्ठ पाठ केले होते. त्यातला एक श्लोक म्हणून दाखवला.

मनपाखरू इवलेसे, त्याने बांधले घरटे देहरूपी वृक्षांवर. मुक्तम ोकळा संचार करण्यासाठी ते पाखरू नभी विहरण्यास निघाले. तेवढ्यात एक जाळे लागले पसरायला. त्या पाखराला कळेना. ते बंदिस्त झाले. मग करमेना. मनास काही सुचेना.

स्वामीजींना तरुणाचे पाठांतर जाणवले. तरुणाला त्यातले गूढ कळले नव्हते. योगशास्त्राचे मर्म उकलले नव्हते. तो गयावया करीत म्हणत होता, स्वामीजी, या इच्छा आदींनी मला पक्के बांधून ठेवले आहे. मला सोडवा.

स्वामीजी काही बोलले नाहीत. त्यांनी शिष्याला हाक मारली. त्याच्या कानात काहीतरी सांगितले. थोड्याच वेळात दुसरे कुणीतरी धावत आले. म्हणाले, स्वामीजी, लवकर चला, एका सज्जनाला एका खांबाने बांधून ठेवले आहे. तो खांब त्या सज्जनाला सोडत नाही. सज्जन कळवळून ओरडतोय. मला सोडवा हो या खांबाच्या विळख्यातून. सारखा येणाऱ्या जाणाऱ्यांना तो विनयवतोय.

स्वामीजींनी त्या तरुणाला पाठवले. त्या माणसाला खांबाच्या विळख्यातून सोडव. असे सांगितले. तरुण गेला. क्षणार्धातच विजयी मुद्रेने परतला. त्या सज्जनाची थट्टा करीत मनापासून हसला व म्हणाला, स्वामीजी, तो सज्जन वेडाच वाटला. का? तुला कसं कळलं?

स्वामीजी, खांबानं त्या सज्जनाला बांधलं नव्हतं.

आवळलं होतं ना ?

छे। त्या सज्जनानंच त्या खांबाला मिठी मारली होती. ती सोडायला तो तयार नव्हता. दगडी खांब, थंडगार, अंगाला त्याचा गारवा केवढा सुखवतो. गुळगुळीत खांब, त्याचा मऊ मऊ स्पर्श. केवढा होतो मला हर्ष, असं बडबडत होता तो. सज्जन. मिठी खांबानं नव्हे, या सज्जनानंच मारली होती.

तेवढ्यात तो सज्जन हसत आला. स्वामीजींना म्हणाला, तुम्ही पाठवलेला तरुण पढतमूर्खच दिसला. खांबानं मला नव्हे, तर मीच खांबाला मिठी मारली आहे. असं मला समजाऊन सांगत होता. स्वतः वासनांना कवटाळून बसलाय आणि म्हणतोय वासनांच सोडत नाहीत. मला योगवासिष्ठातील श्लोकांचा अर्थ समजावा या तरुणाला, म्हणून मीच तो खांबाला मिठी मारण्याचा देखावा केला.

तरुण सगळे समजला. माणूसच घट्ट आवळून बसलेला असतो वासनांना. त्यानेच मिठी मारलेली असते इच्छांना. कामनांना. मुक्त होण्यासठी त्यानेच सोडवायला हवी ती मिठी दोष आपला, मग नावे कशाला ठेवायची वासनेला, इच्छेला, कामनेला? वीरशैव संत अक्कमहादेवी सांगतात,

तुला कळेपर्यंत कुणी बांधलं कुणाला ? आहेत हे वासनांचे खेळ ? की तुझेच वेडगळ चाळे ? तूच आहेस लोभाचं स्थान, विकाराचं घर, गर्वाचं कुंपण, हेव्याचा मुखवटा तूच कारण तुझ्या बंधनाला, तूच मारली आहेस मिठी वासनांना. हे तुला कळेपर्यंत, हे तुझे अज्ञान गळेपर्यंत तुला दुसरा मार्गच नाही सुख मिळवायचा

आपणच आपल्याला बंधनात टाकतो. आपणस त्यात बांधलेले इच्छितो. बंधनाचे दुःख जाणवले की तेवढ्यापुरते ओरडतो. पुन्हा इच्छा, वासना, कामना यांनाच उराशी आवळतो. करावा मनाचा निर्धार, द्यावी वासनादींना करारी हार, हीच पुरुषार्थाची धार. **– किशोर गांधी**

नाशिकमध्ये २९ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर, पालक परिचय मेळावा

नगर – सत्यशोधक माळी समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर, पालक परिचय मेळाव्याचे आयोजन २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते ३ या वेळात दादासाहेब गायकवाड सभागृह, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक येथे विनामूल्य आयोजित करण्यात आल्याची माहिती सीताराम दळवी व मच्छिंद्र नामदेव आगरकर यांनी दिली. या मेळाव्यासाठी कोणतेही नोंदणी शुल्क नसून चहा, नाष्टा व जेवणाची व्यवस्था विनामूल्य केलेली आहे. मेळाव्यास राज्यभरातील माळी समाजातील वधू-वर व पालक सहभागी होणार आहेत. त्यामुळे समाजातील बांधवांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेच्यावतीने २२ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिर

नगर – गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, तसेच समाजात रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत, पहिला मजला, वनश्री बलभीमराव डोके कॉर्नर, संत नामदेव चौक, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे.

रक्तदान हे केवळ सामाजिक कार्य नसून, ते एखाद्याला जीवनदान देण्याचे माध्यम आहे. एका व्यक्तीने केलेल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णांना मोठा आधार मिळू शकतो. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण तसेच विविध आजारांमुळे रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी, विशेषतः तरुणांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमातून माणुसकीचे नाते अधिक दृढ करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. नागरिकांनी स्वतः रक्तदान करावे, तसेच मित्रपरिवार, नातेवाईक आणि परिचितांनाही रक्तदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. रक्तदान हेच श्रेष्ठ दान, चला जपूया माणुसकीचे नाते!

या संदेशातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या विभागाध्यक्षपदी रमेश सानप यांची निवड

एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार; 'लाल परीचे खाजगीकरण होऊ देणार नाही' : रमेश सानप

नगर – सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या अहिल्यानगर विभागाध्यक्षपदी रमेश सानप यांची निवड झाल्याबद्दल एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा निर्धार विभागाध्यक्ष रमेश सानप यांनी व्यक्त केला. तसेच एसटी महामंडळाचे खाजगीकरण होऊ देणार नाही, लाल परीचे हित जपण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.



सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या अहिल्यानगर विभागाध्यक्षपदी रमेश सानप यांची निवड झाल्याबद्दल एसटी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. (छायाचित्र : लहू दळवी)

एसटी महामंडळातील कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यांच्या व्यथा मोठ्या आहेत. आमदार गोपीनाथ पडळकर आणि सदाशिव खोत यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या माध्यमातून एसटी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले जात आहे. एसटी कर्मचारी आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या कष्टावर महामंडळ चालत असून त्यांच्या मेहनतीमुळेच लाल परी टिकून आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचे हित राखणे आणि लाल परीचे खाजगीकरण होऊ न देणे ही सर्व कामगारांची जबाबदारी आहे, असे रमेश सानप यांनी सांगितले.

एसटी महामंडळामध्ये काही अधिकाऱ्यांची मनमानी सुरू असून कर्मचारी त्याला कंटाळले आहेत. अधिकाऱ्यांनी खुर्चीचा अहंकार न बाळगता कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाच्या एसटी कर्मचारी संघटनेमध्ये काम केले असून त्याचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रशासनाकडून कोणत्या पद्धतीने मार्गी लावून घ्यायचे, याची मला चांगली माहिती आहे. संघटनेच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन रमेश सानप यांनी केले.

यावेळी बाबासाहेब सानप, माजी नगरसेवक सुनील भिंगारे, विपुल पाडळे, विठ्ठल कंठाळे, अनिल शिरसाठ, विठ्ठल जायभाये, ब्रह्मदेव जायभाये, दादासाहेब सांगळे, हरिभाऊ फुंदे, चंद्रकांत सानप, कैलास गर्जे, शरद मुर्तडकर, नईम शेख, संदीप खांडरे उपस्थित होते.

दिल्ली येथील अचिव्हर अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने जालिंदर बोरुडे यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान



नगर – दिल्ली येथील अचिव्हर अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांना सामाजिक कार्य क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. या सन्मानाची माहिती कौन्सिलचे चेअरमन डॉ. एस. एन. उपाधी आणि सेक्रेटरी सी. एन. सिन्हा यांनी दिली. अचिव्हर अवॉर्ड कौन्सिल ही भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडे नोंदणीकृत संस्था असून, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचे कार्य या संस्थेच्या माध्यमातून केले जाते. संस्थेच्या मूल्यांकन मंडळ, संचालक मंडळ आणि अध्यक्षांच्या समितीने जालिंदर बोरुडे यांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्याची माहिती व त्यांच्या योगदानाचे मूल्यमापन करून त्यांची या मानाच्या पदवीसाठी निवड केली.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून तब्बल ३५ वर्षांपासून अविरतपणे नेत्रसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे नेत्रोपचार घेणे शक्य नसलेल्या गरजू रुग्णांना दृष्टी मिळावी, या उदात्त हेतूने त्यांनी स्वखर्चाने तसेच विविध सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने राज्यातील अनेक भागांत मोफत नेत्रतपासणी शिबिरांचे आयोजन केले आहे. या शिबिरांमध्ये शेकडो नव्हे, तर हजारो गरजू रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून त्यांना आवश्यक उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. मोतिबिंदूचे निदान झालेल्या अनेक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा जग पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

नेत्रसेवेच्या माध्यमातून केवळ रुग्णांवर उपचार करण्यापुरते मर्यादित न राहता समाजात नेत्रदान आणि अवयवदानाविषयी जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही बोरुडे यांनी हाती घेतले आहे. मृत्यूनंतरही आपले डोळे आणि अवयव इतरांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करू शकतात, हा मानवतावादी विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, तर अवयवदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, हा संदेश विविध उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दिला जात आहे.



माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली असता भाविकांनी ठीकठिकाणी पालखीचे स्वागत केले.

शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त नगर शहरात शोभायात्रा

नगर – सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मठामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच प्रकट दीनानिमित्त माळीवाडा परिसर येथून शोभायात्रा काढण्यात आली होती. घोडेस्वार, पारंपारिक वाद्य, फुलांनी सजवलेली पालखीमध्ये शंकर महाराज यांची मूर्ती अशा शोभायात्रेचे ठीकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते. शोभायात्रा मार्गावर सुंदर रांगोळी काढली होती.

ही शोभायात्रा ब्राह्मण गल्ली येथील मठापासून सुरु होऊन बारातोटी कारंजा, बंगाल चोकी, वसंत टॉकीज, कोठीची तालीम, ढोर गली, माळीवाडा चोक, श्री विशाल गणेश मंदिर, फुलसौंदर चौक मार्गे पुन्हा मठामध्ये समारोप करण्यात आला. तसेच यावेळी प्रकट दिनानिमित्त शंकर सावली मठ येथे दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शंकर गीता पारायण, महाअभिषेक, महा पालखी प्रदक्षिणा, महाआरती तसेच महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते. प्रकट दिन कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सेवेकरी परिश्रम घेत होते. या कार्यक्रमाचे नियोजन मठाधिपती कमलेश महाराज जंजाळे यांनी केले होते

'कैवल्यधाम तीर्था'साठी ५१ लाखांची देणगी देण्याचे जैन मंदिराचे कार्य आदर्शवत

अशोक (बाबूशेठ) बोरा



अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हार (राहाता) येथे साध्वी कैवल्यारत्नाश्रीजींच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य कैवल्यधाम श्वेतांबरी जैन तीर्थ उभारण्यात येत आहे. या जैन तीर्थ क्षेत्रासाठी कापड बाजार जैन मंदिराच्या वतीने ५१ लाख रुपयांची देणगी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांच्या हस्ते देण्यात आली.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हार (राहाता) येथे साध्वी कैवल्यारत्नाश्रीजींच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य कैवल्यधाम श्वेतांबरी जैन तीर्थ उभारण्यात येत आहे. या जैन तीर्थ क्षेत्रासाठी कापड बाजार जैन मंदिराच्या वतीने ५१ लाख रुपयांची देणगी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांच्या हस्ते देण्यात आली. प्रारंभी ज्ञानप्रेम विजयजी महाराजा साहेब यांनी मांगलिक देऊन तीर्थक्षेत्रांचे महत्त्व समजून सांगितले. यावेळी कापड बाजार जैन मंदिराच्या वतीने समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांना समाज गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

बाबूशेठ बोरा म्हणाले की, कापड बाजार जैन मंदिर ट्रस्टींनी केलेला सत्कार समाज व धर्मासाठी आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे. कापड बाजार जैन मंदिर ही नगर जिल्ह्यातील जैन मंदिरांची शिखर संस्था आहे. मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सर्व ट्रस्टी मंडळ धार्मिक कार्यात नेहमीच सक्रिय योगदान देत असतात. कोल्हार येथील कैवल्यधाम जैन तीर्थ भव्य दिव्य तीर्थ बनत आहे. ८ फेब्रुवारी २०२७ रोजी या तीर्थाची प्राण प्रतिष्ठा होणार आहे. राजस्थान, मकराना येथील कुशल कारागीर मागील पाच वर्षांपासून याठिकाणी मार्बलचे आखीव रेखीव सुंदर नक्षीकाम करत आहेत. याठिकाणी भाविकांसाठी भोजन शाळा, निवास व्यवस्था, निसर्गाचे सान्निध्य असणार आहे. नगर जिल्ह्यासाठी हे तीर्थ खऱ्या अर्थाने मोठे पर्वणी क्षेत्र बनणार आहे. सध्या या तीर्थाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या जैन तीर्थासाठी कापड बाजार जैन मंदिराने ५१ लाखांची देणगी देऊन धर्म कार्यास हातभार लावला आहे. हाच आदर्श ठेवून समाजातील विविध धार्मिक ट्रस्ट, दानशूरांनी या जैन तीर्थास देणग्या द्याव्यात, असे आवाहन बाबूशेठ बोरा यांनी केले.

प्रारंभी स्वागत करताना जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा म्हणाले की, बाबूशेठ बोरा यांनी समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्षपद सांभाळताना आनंद धाम परिसरात उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा चातुर्मास अतिशय चांगल्या पद्धतीने होण्यात मोठे योगदान दिले आहे. भाविकांची अतिशय चांगली व्यवस्था त्यांनी केली. चातुर्मास निर्विघ्नपणे आणि उत्साहात पार पडला आहे. याबद्दल त्यांचा समाज गौरव पुरस्काराने झालेला सन्मान खरोखर कौतुकास्पद आहे. कापड बाजार जैन मंदिरातर्फे मोठा भाऊ म्हणून जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या जैन मंदिरांना वेळोवेळी देणगी देण्यात येते. कैवल्यधामच्या रूपाने नगर जिल्ह्यात अतिशय भव्य दिव्य जैन तीर्थ साकारले जात आहे. त्यामुळे जैन धर्मियांसाठी एक मोठे कार्य होत आहे. साध्वीजी एक मोठं धार्मिक कार्य मार्गी लावत आहेत, यासाठी त्यांना खूप खूप धन्यवाद. यासाठी त्यांची जितकी त्यांची प्रशंसा करावी ती थोडीच आहे व शब्दही कमी पडतील. भविष्यातही जैन मंदिर ट्रस्ट अशा धार्मिक कार्यास देणगी देण्याचा प्रयत्न करेन अशी ग्वाही देतो. समाजातील ट्रस्ट व खाजगी व्यक्तींनी पुढे येत या कार्यास हातभार लावावा असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले आहे.

याप्रसंगी अध्यक्ष सुभाष मुथा, ट्रस्टी सीए राजूभाई शहा, जयकुमार पुंगलिया, विनोदभाई शहा, डॉ.सागर पटवा, राजूभाई बी. शहा, विजयकुमार मुथा, जगदीशभाई शहा आदी उपस्थित होते.



भारत भारतीच्या दिवाळी स्नेहमेळाव्यात राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगरच्या भारत भारती महिला विभागाच्या नव्या कार्यकारणीची घोषणा करण्यात आली.

भारत भारतीच्या महिला विभागाच्या अध्यक्षपदी स्वीटी पंजाबी

विभागाच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा

नगर – भारत भारती या राष्ट्रीय एकात्मतेसाठी योगदान देणाऱ्या संस्थेच्या वतीने दिवाळी स्नेह मेळावा राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यामध्ये अहिल्यानगरच्या भारत भारती महिला विभागाच्या नव्या कार्यकारणीची घोषणा केली. यामध्ये महिला विभागाच्या अध्यक्षपदी स्वीटी पंजाबी, उपाध्यक्ष श्यामली रासने व वर्षा आरोळे, सचिव सोनाली कांबळे, सहसचिव मीना हरवानी व मधु भंडारी, कोषाध्यक्ष अनिता गवळी, सह कोषाध्यक्ष मयुरा कोद्रे, संघटक श्रेया देशमुख व अंकिता जग्गी, उपक्रम प्रमुख हेमा वसंत व वर्षा नरवडे, प्रसिद्धी प्रमुख शिल्पा नय्यर व डिंपल शहा, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख वर्षा पंडित आदींची नियुक्ती करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रदेश संघटक गायत्री दीदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी उपस्थित होते. भारत भारतीचे प्रदेश उपाध्यक्ष कमलेश भंडारी, अहिल्यानगरचे अध्यक्ष रमेश रसने, सचिव चंद्रकांत पंडित, माजी अध्यक्षा विनया शेट्टी यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

विनय पत्राळे म्हणाले, देशातील सर्व भागांमध्ये भारत भरती राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम करत आहे. या कामात महिलांचा सक्रिय सहभाग आहे. परमेश्वराने स्त्रियांना उपजातच जबाबदार बनवले आहे. त्यामुळे राष्ट्राची जबाबदारी खंबीरपणे सांभाळण्यास स्त्री सक्षम आहे. त्यामुळे स्त्री शक्तीचा सन्मान कायम व्हावा. नगरमध्ये भारत भारती गेल्या सोळा वर्षांपासून उत्कृष्ट काम करत आहे. हे काम आता जिल्ह्यातील सर्व तालुक्यात स्तरावर पसरावे यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी यांनी सांगितले की, भारत भारतीचा प्रत्येक सदस्य आपापला व्यवसाय सांभाळून तन-मन-धनाने भारत भरतीसाठी योगदान देत आहे. अनेक सामाजिक उपक्रमांनी गरजूंना मदत करण्याबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम करत आहोत, असे सांगून महिला विभागाच्या माजी अध्यक्षा विनया शेट्टी यांच्या कार्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमात मिलिंद कुलकर्णी यांची भारत भारतीच्या जिल्हा संयोजक पदी निवड करण्यात आली. शंतनू खानविलकर यांनी सूत्रसंचालन केले. या स्नेहमेळाव्यास माजी अध्यक्ष के.के. शेट्टी, दामोदर बठेजा, अशोक मवाळ व चेतन जग्गी, दिनेश देवी, कॅप्टन रावत, रितेश नायर, अमित ढोकरीया, चिराग शहा, श्रीराम कुमावत, हरीश हरवानी, युवराज पोटे, सतीश गवळी, कृष्णा नरवडे, संदीप कोद्रे आदी उपस्थित होते.

ब्रह्माकुमारी ध्यान मंदिराच्या संरक्षक भिंतीच्या काही भाग महानगरपालिकेने पाडला; पाडकामाला साध्वींचा तीव्र विरोध

कारवाई न करता पथक परतले, साध्वींची पोलीस संरक्षणाची मागणी



ब्रह्माकुमारी ध्यान मंदिराच्या संरक्षक भिंतीच्या पाडकामाला विरोध करताना मंदिरातील साध्वी व विद्यार्थी.

नगर – महावीरनगर, सावेडी येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या ध्यान मंदिर परिसरातील ब्रह्माभोजन व ध्यानधारणेसाठी वापरण्यात येणाऱ्या जागेच्या संरक्षक भिंतीचा काही भाग महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने पाडल्याने १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या कारवाईला ध्यान मंदिरातील महिला साध्वींनी तीव्र विरोध केला. अखेर ११२ नंबरवर कॉल करुन साध्वींनी पोलिसांना पाचारण केले, त्यानंतर पुढील कारवाई थांबविण्यात आली. या प्रकरणी साध्वींनी महापालिकेच्या कारवाईविरोधात लेखी तक्रार देत पोलीस संरक्षणाची मागणी केली आहे.

१८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने ध्यान मंदिर परिसरातील संरक्षक भिंतीचा काही भाग पाडण्यास सुरुवात केली. ही कारवाई सुरू होताच मंदिरातील महिला साध्वींनी त्याला आक्षेप घेतला. कोणतीही पूर्वसूचना किंवा पाडकामाची नोटीस न देता ही कारवाई करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच संबंधित जागेची कागदपत्रे उपलब्ध असून, महापालिकेची कारवाई बेकायदेशीर असल्याचे सांगत त्यांनी काम थांबविण्याची मागणी केली.

दरम्यान, महापालिका अधिकाऱ्यांनी संबंधित जागेचे मालकी हक्क व जागेच्या वापरासंदर्भातील कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. महापालिकेच्या वतीने सदर जागेवर अतिक्रमण असल्याचे सांगण्यात येत असल्याने दोन्ही बाजूंमध्ये वाद अधिकच वाढला. यानंतर ध्यान मंदिराच्या वतीने पोलिसांना बोलाविण्यात आले. मंदिर प्रशासनाने संबंधित जागेची कागदपत्रे पोलिसांसमोर सादर केली. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर पाडकामाची कारवाई थांबविण्यात आली.

या घटनेनंतर पोलिसांनी महापालिकेचे अधिकारी आणि ध्यान मंदिरातील प्रमुख साध्वी यांना तोफखाना पोलीस ठाण्यात नेऊन दोन्ही बाजूंचे म्हणणे जाणून घेतले. यावेळी साध्वींच्या वतीने लेखी तक्रार दाखल करण्यात आली. मंदिरातील महिला साध्वी, विद्यार्थी आणि सेवाधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित जागेवर ताबा मिळविण्यासाठी काही व्यक्ती कोणत्याही थराला जाऊ शकतात, अशी भीती व्यक्त करून ध्यान मंदिराला पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे.

अहिल्यानगरमधील या संस्थेचे केंद्र सन १९८९ पासून महावीरनगर, सावेडी येथे कार्यरत आहे. जिल्हा सहकारी दूध व्यावसायिक संघ लि., अहमदनगर यांनी सर्व्हे क्रमांक १६१/१ व १६१/२ मधील सावेडी देवस्थान इनाम जमीन संस्थेला मंदिर व ईश्वरीय विद्यालयाच्या वापरासाठी मालकी हक्काने दिल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. तेव्हापासून आजपर्यंत या जागेत ईश्वरीय सेवा आणि आध्यात्मिक उपक्रम सुरू असल्याचे म्हंटले आहे.

मात्र, ध्यान मंदिरासमोर नव्याने उभारण्यात येत असलेल्या इमारतीतील महिलांसाठी जिम सुरू करण्याच्या उद्देशाने मंदिराची जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप संस्थेच्या वतीने ॲड. निर्मला चौधरी यांनी केला आहे. या जागेच्या वापरावरून यापूर्वीही वाद निर्माण झाले असून, महापालिका कार्यालयात साध्वी प्रभा दिदी आणि ॲड. निर्मला चौधरी यांच्या विरोधात खोट्या आशयाचे अर्ज दाखल केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या परिसरातील काही व्यक्तींकडून वारंवार वादविवाद करणे, धमकावणे तसेच विद्यालयाचे शैक्षणिक व आध्यात्मिक कार्य आणि तेथे वास्तव्यास असलेल्या साध्वींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल, अशा प्रकारच्या कृती केल्या जात असल्याचा आरोप संस्थेच्या वतीने करण्यात आला आहे. यासंदर्भात संबंधित व्यक्तींविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात वेळोवेळी तक्रारी दाखल केल्याचेही सांगण्यात आले.

या प्रकारामुळे ध्यान मंदिरातील साध्वी, विद्यार्थी आणि सेवाधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ध्यानधारणेसाठी आवश्यक असलेली शांतता आणि सुरक्षितता अबाधित राहणे गरजेचे आहे. संस्थेच्या जागेवर अतिक्रमण करून ध्यानधारणेच्या कार्यात अडथळे आणण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत. या विरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा प्रभा दिदी यांनी दिला आहे.

गुलमोहोर रोडवरील मार्कंडेय सोसायटीत २१ नोव्हेंबर पासून भागवत कथेस प्रारंभ

अहिल्यानगरमध्ये प्रथमच २१ नोव्हेंबर रोजी ख्रिस्ती गॉस्पेल बँडचा भक्तिसंगीताचा स्वरानंद



अभिजीत महाराज गोंदीकर

नगर – सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील मार्कंडेय सोसायटीत वेदशास्त्र मूर्ती अभिजीत महाराज गोंदीकर (जालना) यांच्या सुमधुर अमृत वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास २१ नोव्हेंबर पासून प्रारंभ होत आहे, अशी माहिती ॲड. डी. डी. घोरपडे यांनी दिली. २१ ते २७ नोव्हेंबर दररोज दुपारी २:३० ते ५:३० या वेळेत ही कथा होणार आहे.

नगर – संत आन्ना चर्च, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या ५० व्या नगर मत माऊली यात्रेच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यानिमित्त यंदा भाविकांसाठी विशेष आकर्षण असणार आहे. मुंबई येथील ख्रिस्ती गॉस्पेल बँड "Echoes of Zion' प्रथमच अहिल्यानगरमध्ये भक्तिसंगीताचा विशेष कार्यक्रम सादर करणार आहे. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून संत आन्ना चर्च येथे हा भक्तिसंगीताचा कार्यक्रम रंगणार आहे.



मरीया मातेवरील श्रद्धा आणि भक्तीचा जागर करणाऱ्या या ऐतिहासिक यात्रेत यंदा संगीताच्या माध्यमातून स्तुती, उपासना आणि आध्यात्मिक आनंदाची अनुभूती भाविकांना घेता येणार आहे. हा बँड आपल्या सुमधुर भक्तिगीतांमधून परमेश्वराची स्तुती आणि उपासनेचे नेतृत्व करणार आहे. बँडमधील गायक आणि संगीतकारांच्या सादरीकरणामुळे उपस्थित भाविकांना एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव मिळणार आहे.

विशेष म्हणजे, अहिल्यानगरमध्ये प्रथमच या गॉस्पेल बँडचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याने ख्रिस्ती समाजासह संगीतप्रेमी आणि भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. भक्तिगीते, संगीत आणि सामूहिक उपासनेच्या माध्यमातून आनंदोत्सव साजरा करण्याची संधी या कार्यक्रमातून उपलब्ध होणार आहे.

गेल्या ५० वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या नगर मत माऊली यात्रेचा यंदाचा सुवर्णमहोत्सवी टप्पा अधिक संस्मरणीय करण्याच्या दृष्टीने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे आणि मुंबई येथून येणाऱ्या भाविकांसाठी हा सोहळा श्रद्धा, भक्ती आणि संगीताचा अविस्मरणीय संगम ठरणार आहे.

पाच दशकांच्या भक्तिपरंपरेला आधुनिक भक्तिसंगीताची जोड देणारा हा विशेष कार्यक्रम नगर मत माऊली यात्रेच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. या भक्तिसंगीताच्या आनंदोत्सवात भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

ज्ञानप्रबोधिनीचे सामाजिक कार्य जाणून घेण्याची अहिल्यानगरवासियांना संधी

नियोजनासाठी २१ नोव्हेंबर रोजी बैठक, महिलांना उपस्थितीचे आवाहन

नगर – शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विविधांगी काम करणारी पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी संस्थेचे कार्य आता अहिल्यानगर शहरातही सुरू होणार आहे. या संस्थेचे काम सर्वांपर्यंत पोहोचावे, त्या कामाची ओळख व्हावी आणि भविष्यात अहिल्यानगरमध्ये ज्ञानप्रबोधिनीच्या काही कार्यदिशांतील काम सुरू करता यावे, या हेतूने महिलांसाठी विस्तार मेळावा २१ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत नगरमधील आयुर्वेद व्यासपीठ सभागृहात (धर्माधिकारी मळा, बालिकाश्रम रस्ता, सावेडी) घेण्यात येणार आहे.

अहिल्यानगर शहरालाही उत्तम शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. इथल्या अनेक महिला या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा एकमेकींना परिचय व्हावा व एक चांगली जोडणी व्हावी यासाठी महिलांनी या मेळाव्याला आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन ज्ञानप्रबोधिनी विस्तार मेळाव्याच्या समितीने केले आहे.

या मेळाव्याच्या निमित्ताने माहिती देताना समितीद्वारे स्पष्ट करण्यात आले की, महिला उत्साहाने वेगवेगळ्या भूमिका निभावत असतात. त्या अनुषंगाने येणारी जबाबदारी, अडचणी यांना तोंड देत असतात. क्वचित कधीतरी मिळणार्या कौतुकाच्या थापेने मोहरूनही जातात. घरातल्या प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक व वैयक्तिक वर्तुळ असतं, तसं महिलांचेही असतं. पण आयुष्याच्या एका टप्प्यावर काहीतरी नवीन शिकावं असं वाटतं, नव्याने काही गोष्टी करून बघाव्यात असं वाटतं. समाजाचं ऋण फेडावं वाटतं, आध्यात्मिकता जपावी वाटते. यामुळे यानिमित्ताने नव्यानं वैचारिक बांधणी करण्याच्या हेतूने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तेथे एकमेकींना समजून घेताना अहिल्यानगर शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचेही नियोजन करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर आणि पुणे आता जणू काही एकमेकांना जोडलंच गेलं आहे. त्यामुळे बहुतांश महिलांना ज्ञान प्रबोधिनी शाळा माहीत असू शकते. या पार्श्वभूमीवर, ज्ञान प्रबोधिनी ही संस्था अजून कोण कोणत्या क्षेत्रांमध्ये कार्य करते हे एक स्त्री म्हणून, एक पालक म्हणून, एक समाजाचा घटक म्हणून जाणून घेऊयात, असे समितीने स्पष्ट केले आहे. तसेच स्त्रियांमध्ये मानसिक स्वास्थ्यासाठी जाणीव जागृती निर्माण करणारा मनोवेध हा कार्यक्रम या मेळाव्यात होईल.



राष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या सलोनी प्रसादचा सन्मान

जम्मू-काश्मीर येथे आयोजित ७० व्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या अहिल्यानगरच्या सलोनी उमेश प्रसाद हिचा सागर भिंगारदिवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच तिचे मुख्य प्रशिक्षक गणेश थिवर, प्रशिक्षक सुनील थिवर आणि ऋषिकेश पोपळघट यांच्या मेहनतीचे व मार्गदर्शनाचेही कौतुक केले. याप्रसंगी सुमित भालेराव, अभिजीत तांबे, वैभव साळवे, सूरज पारधे आदी उपस्थित होते.

जय हिंद जिल्हा परिषद पगारदार सोसायटीच्या चेअरमनपदी जालिंदर ढवळे यांची बिनविरोध निवड



नगर – जय हिंद अहिल्यानगर जिल्हा परिषद पगारदार नोकरांची सहकारी सोसायटी लि. अहिल्यानगर या संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीची प्रक्रिया पार पडली. त्यात चेअरमन पदाकरिता जालिंदर ढवळे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी नितीन नगरे यांनी घोषित केले. तसेच व्हाईस चेअरमन पदासाठी मोहनराव पोकळे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांचीही व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली.

निवडीनंतर महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष आबा सोनवणे यांच्या वतीने नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी सभासदांचे हिताचे निर्णय घेऊन संस्थेचे कामकाज योग्य पद्धतीने चालवण्याबाबत मार्गदर्शन केले.

संस्थेमध्ये बराच काळ प्रशासक असल्याने धोरणात्मक निर्णय घेताना काही मर्यादा होत्या, त्यामुळे सभासद बांधवांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. यापुढे सभासद बांधवांचे हित डोळ्यासमोर ठेवून योग्य ते धोरणात्मक निर्णय घेऊन संस्थेची भरभराट कशी होईल, याकडे लक्ष देऊन कारभार केला जाईल, असे प्रतिपादन नवनिर्वाचित चेअरमन जालिंदर ढवळे यांनी केले.

चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्या बिनविरोध निवडीसाठी संस्थेचे माजी चेअरमन किरण सोनवणे, भरत गोर्डे, माजी व्हाईस चेअरमन भिवसेन हराळ यांच्यासह संचालक गणपत रोडे मेजर, नितीन मोरे पाटील, जलाल शेख, श्रीमती शारदा साळी, श्रीमती शिल्पा थोरात, शिवाजी बेल्हेकर, मोहन भापकर, प्रकाश रोरे, गणेश परदेशी, बलभीम हारदे, हर्षद शेख यांनी सहकार्य केले.

दिवाळीत घरवंट्याच्या माध्यमातून अहिल्यानगर येथील संयुक्ता - अवंतिकाने जपली तेलुगू संस्कृतीची परंपरा !



नगर – अहिल्यानगर येथील एकदंत कॉलनी, दातरंगे मळा परिसरातील संयुक्ता अमोल गाजेंगी आणि अवंतिका अमोल गाजेंगी या दोघींनी दिवाळीनिमित्त आकर्षक घरवंटा (बोम्मरील्लू) साकारला आहे. चिमुकल्या हातांनी तयार केलेल्या या घरवंट्यातून तेलुगू संस्कृती आणि पारंपरिक संसाराचे सुंदर दर्शन घडवण्यात आले आहे.

दिवाळीमध्ये देवी लक्ष्मी आणि भगवान गणेशाचे घरात आगमन व्हावे, घरात सुख, शांती, समृद्धी आणि धनधान्य नांदावे, या श्रद्धेतून घरवंटा तयार करण्याची परंपरा आहे. ही परंपरा प्रामुख्याने घरातील मुली आणि लहान मुले मोठ्या उत्साहाने पार पाडतात. माती, विटा किंवा पुठ्ठ्याच्या साहाय्याने छोटे घर तयार करून त्याला फुले, दिवे, रांगोळी आणि विविध खेळण्यांनी सजवले जाते. या पारंपरिक उपक्रमाला तेलुगू भाषेत 'बोम्मरील्लू' असे म्हटले जाते.

या घरवंट्याचे विशेष आकर्षण म्हणजे दैनंदिन संसारात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची केलेली मांडणी. स्वयंपाकघरात लागणारी छोटी छोटी भांडी, ताट, वाट्या, पातेली, पळी, चमचे तसेच विविध संसारोपयोगी साहित्य घरवंट्यात मांडण्यात आले आहे. प्रत्यक्ष घरात ज्या पद्धतीने दररोज स्वयंपाक केला जातो, त्याच पद्धतीने या छोटेखानी घरात चहा, नाश्ता आणि जेवण तयार करण्याचा खेळ रंगतो. सकाळचा चहा-नाश्ता, दुपारचे जेवण अशा दैनंदिन दिनक्रमाचे अनुकरण करत संयुक्ता आणि अवंतिका घरवंट्यातून छोटेखानी संसाराचा आनंद अनुभवतात. त्यामुळे हा घरवंटा केवळ सजावटीपुरता मर्यादित न राहता पारंपरिक कौटुंबिक जीवनाचे प्रतीक ठरला आहे.

संयुक्ता आणि अवंतिका यांनी कल्पकतेने साकारलेल्या या घरवंट्यातून तेलुगू संस्कृतीतील परंपरा, बालपणीचे खेळ आणि कौटुंबिक संस्कार यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि व्यवहारज्ञान विकसित होण्यास मदत होते. आधुनिक काळातही नव्या पिढीने आपल्या संस्कृतीचा आणि परंपरांचा वारसा उत्साहाने जपण्याचा केलेला हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

महापालिकेतर्फे पाच ई-कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन

नगर – अहिल्यानगर महापालिकेतर्फे स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत शहरात ई-कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी ३६५ दिवस सुरू राहणाऱ्या पाच ई-कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त हरिकल्याण येलगट्टे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सेवा भारतीचे उदय भणगे, पुष्पर कुलकर्णी, हरियाली संस्थेचे सुरेश खामकर, घनकचरा व्यवस्थापन विभागप्रमुख प्रशांत रामदीन तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

महानगरपालिकेतर्फे सुरू करण्यात आलेली ही पाच ई-कचरा संकलन केंद्रे प्रभाग समिती कार्यालय क्रमांक १, २, ३ व ४ तसेच महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात कार्यान्वित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर वर्षभर नागरिकांना घरातील ई-कचरा जमा करता येणार आहे. मोबाईल, चार्जर, बॅटरी, संगणक, की-बोर्ड, माऊस, खराब इलेक्ट्रॉनिक उपकरणे व इतर ई-कचरा यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ई-कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट लावल्यास पर्यावरण व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या घरातील ई-कचरा इतर घनकचऱ्यात न मिसळता जवळच्या ई-कचरा संकलन केंद्रात जमा करावा. संकलित ई-कचऱ्यावर नियमानुसार शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येणार आहे.



अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत शहरात ई-कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी ३६५ दिवस सुरू राहणाऱ्या पाच ई-कचरा संकलन केंद्रांचे उद्घाटन महापौर ज्योती गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. (छायाचित्र : लहू दळवी)

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

युनिव्हर्सल किडनीमुळे रक्ताच्या गटाचे बंधन सपणार

अवयव प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात शास्त्रज्ञांनी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. रक्ताचा गट (ब्लड ग्रुप) जुळत नसल्यामुळे किडनी प्रत्यारोपणासाठी प्रदीर्घ प्रतीक्षा करणाऱ्या रुग्णांसाठी आता युनिव्हर्सल किडनी हे वरदान ठरणार आहे. ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठातील डॉ. विदर आणि त्यांच्या टीमने केलेल्या या संशोधनामुळे आता कोणत्याही रक्तगटाच्या रुग्णाला कोणत्याही रक्तगटाची किडनी बसवणे शक्य होणार आहे.

संशोधन नक्की काय आहे?

प्रत्यारोपणामध्ये सर्वात मोठा अडथळा असतो तो म्हणजे रक्तातील अँटिबॉडीजब. जर रुग्णाचा रक्तगट आणि दात्याचा रक्तगट जुळला नाही, तर शरीर त्या अवयवाला नाकारते. शास्त्रज्ञांनी एका विशेष एंझाईमचा वापर करून किडनीच्या पेशींवरील रक्ताचे गट दर्शवणारे रेणू (अँटिजेन) काढून टाकले आहेत. यामुळे ती किडनी तांत्रिकदृष्ट्या ओ पॉझिटिव्ह रक्तासारखी म्हणजेच युनिव्हर्सल बनली आहे. या युनिव्हर्सल किडनीची प्राण्यांवर चाचणी करण्यात आली. या चाचणीत असे दिसून आले की, यामुळे प्रत्यारोपण सुलभ होते. 'हे संशोधन रुग्णांच्या दीर्घकालीन आरोग्यात सुधारणा करण्यासाठी मोलाचे ठरेल,' असे डॉ. विदर यांनी सांगितले.

प्रयोगादरम्यान, तिसऱ्या दिवशी किडनी पुन्हा मूळ रक्तगटाचे गुणधर्म दाखवू लागली, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीने थोडा विरोध केला. मात्र, हा विरोध अपेक्षेपेक्षा कमी होता. संशोधक आता यावर काम करत असून, ही किडनी शरीरात कायमस्वरूपी कशी टिकेल, याचे परीक्षण करत आहेत. भारतासारख्या देशात, जिथे किडनी दात्यांची कमतरता आहे आणि रक्ताचा गट न जुळल्यामुळे अनेक शस्त्रक्रिया रखडतात, तिथे हे तंत्रज्ञान क्रांती घडवू शकते. यामुळे वेटिंग लिस्ट कमी होईल आणि अधिक रुग्णांचे प्राण वाचतील. 'अनेक वर्षांचे मूलभूत विज्ञान जेव्हा प्रत्यक्ष रुग्णसेवेशी जोडले जाते, तेव्हा असे निकाल मिळतात. हे आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देते,' असे डॉ. विदर यांनी नमूद केले.





क्रिकेटचा खेळ पहिल्यांदा कुठे खेळला गेला?

क्रिकेट हा खेळ आज जगातील सर्वात लोकप्रिय खेळांपैकी एक आहे. त्यामुळे या खेळाची मुळे इंग्रजी इतिहासात खोलवर रुजलेली आहेत. आपण पाहिले तर आज जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात क्रिकेट खेळ मोठ्या आवडीने खेळला जातो. पण, क्रिकेट पहिल्यांदा कसा आणि कुठे खेळला गेला हे तुम्हाला माहिती आहे का? क्रिकेटची सुरुवात ही आग्नेय इंग्लंडमध्ये वील्ड नावाच्या एका ठिकाणी झाली होती. विशेषतः, तेथील केंट आणि ससेक्स या काही प्रदेशांमध्ये क्रिकेट हा खेळ खेळला जात होता. इतिहासकारांचा असा विश्वास आहे की, हा खेळ सॅक्सन किंवा सुरुवातीच्या नॉर्मन काळात १६ व्या शतकाच्या आसपास सुरू झाला.

या खेळाच्या सुरुवातीच्या स्वरूपात क्रिकेट हा खेळ लहान मुलं अर्थातच मोकळ्या मैदानात खेळत असत. त्यावेळी बॅट हा प्रकार नव्हता म्हणून त्याऐवजी वाकलेली काठी किंवा लाकडाचा तुकडा वापरत असत. चेंडू हा लोकर, कापडाचे तुकडे किंवा दगडापासून बनवला जात असे. क्रिकेटच्या अस्तित्वाचा सर्वात मजबूत ऐतिहासिक पुरावा १५९८ मध्ये सरे येथील एका न्यायालयीन खटल्यातून मिळतो. या प्रकरणात जॉन डेरिक नावाच्या ५९ वर्षीय व्यक्तीने साक्ष दिली की, तो आणि त्याचे शाळेतील मित्र १५५० च्या सुमारास इंग्लंडमधील गिल्डफोर्ड येथे क्रिकेट नावाचा खेळ खेळले होते.

हा दस्तावेज क्रिकेटचा सर्वात जुना लिखित संदर्भ मानला जातो. त्यावरून असे सूचित होते की, १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत हा खेळ नियमितपणे खेळला जात होता. १७ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत क्रिकेट शाळेच्या मैदानाबाहेर गेले आणि प्रौढांमध्ये हा खेळ खूप लोकप्रिय झाला. १६११ च्या नोंदींवरून असे दिसून येते की, इंग्लंडच्या ससेक्स या प्रदेशामधील दोन पुरुषांनी रविवारी चर्चला जाण्याऐवजी क्रिकेट खेळल्याबद्दल त्यांना दंड ठोठावण्यात आला होता. क्रिकेटची लोकप्रियता वाढत असताना या खेळाचे नियम ठरविले गेले. क्रिकेटचे पहिले अधिकृत नियम १७४४ मध्ये लिहिले गेले. १७८७ मध्ये लंडनमध्ये मेरीलेबोन क्रिकेट क्लबची स्थापना झाली तेव्हा हे नियम पहिल्यांदा पाळण्यात आले. क्रिकेटचे नियम सुधारण्यात आणि राखण्यात या क्लबने मोठी भूमिका बजावली. क्रिकेटचे आंतरराष्ट्रीय खेळात रूपांतर १९ व्या शतकात सुरू झाले. पहिला अधिकृत क्रिकेटचा सामना १८७७ मध्ये मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळला गेला. मनोरंजक बाब म्हणजे, १८४४ मध्ये कॅनडा आणि अमेरिका यांच्यात यापेक्षाही आधीचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला गेला होता, तेव्हा हा सामना अनधिकृत होता. १८ व्या शतकात ब्रिटिश खलाशी आणि सैनिकांनी क्रिकेट भारतात आणले. देशातील पहिला क्रिकेट क्लब १७९२ मध्ये कोलकाता येथे स्थापन झाला. कालांतराने भारतीयांनी मोठ्या उत्साहाने हा खेळ स्वीकारला.

ग्रीसमधील समुदायाचे नाते थेट कांस्य युगाशी!

दक्षिण ग्रीसच्या पेलोपोनेशियन द्वीपकल्पाच्या दुर्गम भागात राहणारा एक गट गेल्या १००० वर्षांहून अधिक काळ जनुकीयदृष्ट्या जगापासून वेगळा राहिला आहे. एका नवीन डीएनए संशोधनातून असे समोर आले आहे की, या समुदायाची मुळे थेट 'कांस्य युगा'पर्यंत जाऊन पोहोचतात.

या गटाला 'डीप मॅनिओट ग्रीक्स' म्हणून ओळखले जाते. संशोधनानुसार, हे लोक प्राचीन ग्रीक आणि बायझँटाईन काळातील रोमन लोकांचे वंशज आहेत. दीर्घकाळ राहिलेला भौगोलिक एकांतवास आणि कडक पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमुळे या समुदायाचे जनुकीय वेगळेपण गेल्या १,४०० वर्षांपासून टिकून राहिले आहे. मॅनी द्वीपकल्प हा प्राचीन काळी 'लॅकोनिया' प्रांताचा भाग होता, जिथे ख्रिस्तपूर्व सातव्या शतकात स्पार्टा या बलाढ्य नगरराज्याचे वर्चस्व होते. इसवी सन सहाव्या शतकात जेव्हा स्लाव्हिक लोकांनी ग्रीसवर आक्रमण केले, तेव्हा संपूर्ण ग्रीसमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या बदलली. मात्र, मॅनी द्वीपकल्पाच्या दक्षिण भागात राहणारे हे लोक या आक्रमणांपासून वाचले. ते उर्वरित ग्रीसपासून भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या पूर्णपणे वेगळे पडले. 'कम्युनिकेशन्स बायोलॉजी' या नियतकालिकात ४ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या अभ्यासात, १०० हून अधिक मॅनिओट लोकांच्या डीएनएची तपासणी करण्यात आली.

त्यातून पुढील गोष्टी समोर आल्या : १. जेनेटिक आयलंड : हा समुदाय एक प्रकारचे 'जनुकीय बेट' आहे, ज्यांच्यावर बाहेरील स्थलांतराचा कोणताही परिणाम झाला नाही. २. मध्ययुगापूर्वीचा आरसा : अभ्यासाचे मुख्य लेखक लिओनिडास-रोमानोस डॅव्हानोग्लू (ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी) यांच्या मते, 'हे लोक मध्ययुगातील मोठ्या उलथापालथीच्या आधीचा दक्षिण ग्रीसचा जनुकीय नकाशा आजही जतन करून आहेत.' ३. स्थलांतराचा प्रभाव नाही : युरोपमधील 'बार्बेरियन आक्रमणे' किंवा स्थलांतराच्या काळात (इ.स. ३०० ते ७००) जर्मनिक टोळ्या, हूण आणि स्लाव्हिक लोक देशभर पसरले; पण या समुदायाची जनुकीय शुद्धता अबाधित राहिली.



कहाणी पहिल्या सार्वजनिक शौचालयाची

आज आपल्याला सार्वजनिक शौचालये ही एक सामान्य सुविधा वाटते; परंतु एक काळ असा होता जेव्हा संपूर्ण जगासाठी हे एक मोठे आश्चर्य होते. एकेकाळी रस्त्यांवर सार्वजनिक शौचालये नसायची, ज्यामुळे विशेषतः महिलांना आणि स्वच्छतेच्या दृष्टीने मोठी गैरसोय व्हायची. मात्र, एका प्लंबरच्या दूरदृष्टीमुळे हे चित्र बदलले. २ फेब्रुवारी हा दिवस स्वच्छतेच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला.



सार्वजनिक स्वच्छतेच्या दिशेने हे ऐतिहासिक पाऊल जॉर्ज जेनिंग्स यांनी उचलले होते. जेनिंग्स हे पेशाने प्लंबर आणि सॅनिटरी इंजिनिअर होते. १८५१ च्या लंडनमधील 'ग्रेट एक्झिबिशन'मध्ये त्यांनी पहिल्यांदा लोकांना 'फ्लश टॉयलेट'ची ओळख करून दिली. त्यांचा हा प्रयोग इतका यशस्वी झाला की, सुमारे ८.२७ लाख लोकांनी प्रत्येकी 'एक पेनी' देऊन या सुविधेचा वापर केला. विशेष म्हणजे, त्याकाळी एक पेनीच्या मोबदल्यात केवळ शौचालयच नाही, तर स्वच्छ सीट, टॉवेल, कंगवा आणि बूट पॉलिश यांसारख्या प्रीमियम सुविधाही देण्यात आल्या होत्या. प्रदर्शनातील यशानंतर, २ फेब्रुवारी १८५२ रोजी लंडनच्या रस्त्यांवर सर्वसामान्यांसाठी कायमस्वरूपी 'पब्लिक फ्लशिंग टॉयलेटस्' सुरू करण्यात आले. त्याकाळी यांना 'पब्लिक वेटिंग रूम्स' म्हटले जाई. पुरुषांसाठी पहिले शौचालय '९५ फ्लीट स्ट्रीट' येथे सुरू झाले.

काही दिवसांनंतर '५१ बेडफोर्ड स्ट्रीट' येथे महिलांसाठी ही सुविधा देण्यात आली. येथे प्रवेशासाठी २ पेनी शुल्क आकारले जाई, तर हात धुणे किंवा ब्रश करणे यांसारख्या सेवांसाठी वेगळे शुल्क होते. व्हिक्टोरियन युगात लंडनची स्थिती आजच्यासारखी नव्हती. शहरातील सर्व सांडपाणी थेट थेम्स नदीत सोडले जाई. यामुळे १८५८ मध्ये शहरात इतकी भयानक दुर्गंधी पसरली की, त्या घटनेला 'ग्रेट स्टिंक' म्हणून ओळखले जाते. या संकटामुळे सरकारला स्वच्छतेबाबत कठोर पावले उचलणे भाग पडले. या दुर्गंधीच्या संकटावर मात करण्यासाठी इंजिनिअर जोसेफ बेजलजेट यांनी आधुनिक 'अंडरग्राऊंड सीवर सिस्टम' (भूमिगत सांडपाणी व्यवस्था) निर्माण केली. या प्रणालीमुळे शहरातील घाण दूर नेणे शक्य झाले आणि साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळवता आले.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जोसेफ यांनी दीडशे वर्षांपूर्वी बनवलेली ही यंत्रणा आजही लंडनमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहे. जॉर्ज जेनिंग्स यांचे फ्लश टॉयलेट आणि जोसेफ बेजलजेट यांची सीवर सिस्टम, या दोघांच्या योगदानामुळे केवळ लंडनचा चेहरामोहरा बदलला नाही, तर संपूर्ण जगाला सार्वजनिक स्वच्छतेचे एक आधुनिक मॉडेल मिळाले.

सावधान! अपुऱ्या झोपेमुळे वाढतोय डिमेंशियाचा धोका

वृद्धावस्थेत विस्मरणाचा आजार (डिमेंशिया) होण्यामागे केवळ वय किंवा आनुवंशिकता जबाबदार नसते, तर अपुरी झोप हा एक मोठा घटक असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. 'सायन्स न्यूज'ने प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, निद्रानाशावर (इन्सॉम्निया) वेळेवर उपचार केल्यास स्मृतिभ्रंशाचा धोका लक्षणीयरीत्या कमी करता येऊ शकतो.



संशोधनातील धक्कादायक निष्कर्ष :

नवीन अभ्यासानुसार, अमेरिकेतील डिमेंशियाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे १२ टक्के (सुमारे ५ लाख रुग्ण) प्रकरणे थेट निद्रानाशाशी संबंधित असू शकतात. संशोधकांनी निद्रानाशाची तुलना उच्च रक्तदाब (हाय ब्लडप्रेशर) आणि श्रवणशक्ती कमी होणे यासारख्या गंभीर घटकांशी केली आहे, जे डिमेंशियाला आमंत्रण देतात. तीव्र निद्रानाश असलेल्या लोकांमध्ये मेंदू वृद्ध होण्याची प्रक्रिया ३.५ वर्षांनी वेगाने होते. शास्त्रज्ञांच्या मते, आपण जेव्हा गाढ झोपेत असतो, तेव्हा मेंदूतील ग्लिम्फॅटिक सिस्टीम सक्रिय होते. ही सिस्टीम मेंदूतील टाकाऊ पदार्थ आणि अमायलॉईड बीटासारखी विषारी प्रथिने स्वच्छ करते. जर झोप पूर्ण झाली नाही, तर ही प्रथिने मेंदूत जमा होतात, ज्यामुळे अल्झायमर आणि डिमेंशियाचा धोका वाढतो.

महिलांना आणि ६०-७० वयोगटातील लोकांना अधिक धोका

या अभ्यासात असे दिसून आले आहे की, महिलांमध्ये निद्रानाशामुळे डिमेंशिया होण्याचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत थोडे जास्त आहे. तसेच, ज्यांचे वय ६० ते ७० च्या दरम्यान आहे, अशा लोकांसाठी ही धोक्याची घंटा आहे. या वयात झोपेच्या सवयी सुधारल्यास भविष्यातील आजार टाळता येऊ शकतात.

झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तज्ज्ञांचे उपाय

नियमित वेळ : झोपण्याची आणि उठण्याची वेळ निश्चित ठेवा. **स्क्रीनपासून दूर :** झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईल किंवा लॅपटॉप वापरणे टाळा. **व्यायाम :** दिवसा नियमित शारीरिक हालचाल करा, ज्यामुळे रात्री गाढ झोप लागण्यास मदत होईल.

तज्ज्ञांचा सल्ला : जर तुम्हाला झोप लागण्यास वारंवार त्रास होत असेल, तर तो केवळ थकवा न समजता डॉक्टरांचा सल्ला घ्या.

'युरोपा'वर सापडले जीवसृष्टीसाठी पोषक रेणू

सौरमालेत पृथ्वीबाहेर जीवसृष्टी शोधणाऱ्या शास्त्रज्ञांना आता एक मोठे यश मिळाले आहे. गुरू ग्रहाचा बर्फाच्छादित चंद्र असलेल्या 'युरोपा'च्या पृष्ठभागावर जीवसृष्टीसाठी पोषक ठरू शकतील असे अमोनियाचे रेणू सापडले आहेत. नासाच्या 'जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी'चे संशोधक अल इम्रान यांनी २५ वर्षांपूर्वीच्या जुन्या माहितीचे विश्लेषण करताना हा महत्त्वपूर्ण शोध लावला आहे.

हे संशोधन 'द प्लॅनेटरी सायन्स जर्नल'मध्ये प्रसिद्ध झाले आहे. 'नासा'ने दिलेल्या माहितीनुसार, शास्त्रज्ञ अल इम्रान यांनी १९९५ ते २००३ दरम्यान गुरूचा अभ्यास करणाऱ्या 'गॅलिलिओ' या मोहिमेतील जुन्या माहितीची पुन्हा तपासणी केली. १९९७ मध्ये गॅलिलिओच्या 'निअर-इन्फ्रारेड मॅपिंग स्पेक्ट्रोमीटर'ने गोळा केलेल्या डेटामध्ये युरोपाच्या बर्फाळ पृष्ठभागावरील भेगांजवळ अमोनियाचे पुसट संकेत मिळाले आहेत. पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन आणि पाण्यासोबतच नायट्रोजन अत्यंत महत्त्वाचा असतो.

अमोनिया हा नायट्रोजनयुक्त रेणू असल्याने, त्याचा शोध लागणे हे युरोपावर जीवसृष्टी असण्याच्या शक्यतेच्या दृष्टीने अत्यंत आशादायक मानले जात आहे. शास्त्रज्ञांच्या मते, युरोपाच्या पृष्ठभागावरील भेगांमधून अमोनिया मिश्रित पाणी बाहेर आले असावे. अमोनिया पाण्याला गोठण्यापासून रोखण्याचे काम करतो, ज्यामुळे अतिथंड वातावरणातही पाणी द्रव स्वरूपात राहू शकते. नायट्रोजन हा जीवसृष्टीच्या रासायनिक प्रक्रियेतील मुख्य घटक असल्याने या शोधाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गॅलिलिओ अंतराळयान २००३ मध्ये इंधन संपल्यामुळे नष्ट करण्यात आले होते.

युरोपा किंवा इतर चंद्रांवर पृथ्वीवरील जीवाणूंचे प्रदूषण होऊ नये, म्हणून हे यान मुद्दाम गुरू ग्रहाच्या वातावरणात पाडून नष्ट करण्यात आले होते. ही मोहीम २० वर्षांपूर्वी संपली असली, तरी नवीन तंत्रज्ञान आणि सखोल अभ्यासाच्या जोरावर शास्त्रज्ञ आजही त्या जुन्या माहितीमधून नवीन शोध लावत आहेत. 'युरोपावर पहिल्यांदाच अशा प्रकारे अमोनियाचा शोध लागला आहे. सौरमालेत पऱ्यहावरील जीवसृष्टी शोधण्यासाठी युरोपा हे सर्वात योग्य ठिकाण असल्याचे यातून पुन्हा सिद्ध होत आहे,' असे 'नासा'च्या निवेदनात म्हटले आहे.



बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेली घोसपुरी (ता.नगर) येथील शेतकरी गोरख किसन मोरे यांच्या गायीची कालवड.

घोसपुरीत बिबट्याच्या हल्ल्यात गोठ्यातील कालवड जागीच ठार

नगर – नगर तालुक्यातील घोसपुरी शिवारात मोळवस्ती लगत असलेल्या एका शेतकऱ्याच्या घराशेजारील गोठ्यात बांधलेल्या गायीच्या कालवडीवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात साधारण २ वर्षे वयाची कालवड जागीच ठार झाली असून त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घोसपुरी शिवारात मोळवस्ती जवळील शेतात गोरख किसन मोरे या शेतकऱ्याची वस्ती आहे. त्यांच्या घराजवळच जनावरांचा गोठा आहे. या गोठ्यात मोरे यांनी जनावरे बांधलेली होती. १९ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बिबट्याने मोरे यांच्या गोठ्यात घुसून गायीच्या २ वर्षे वयाच्या कालवडीवर हल्ला केला. या हल्ल्याने बिबट्याने कालवडीची मान पकडून फाडली. त्यामुळे कालवडीचा जागीच मृत्यू झाला. इतर जनावरांनी आरडाओरडा केल्यानंतर बिबट्या तेथून निघून गेला. जनावरांचा आवाज ऐकून शेतकरी मोरे घराबाहेर आले असता त्यांना कालवड मृत अवस्थेत आढळून आली.

याबाबत त्यांनी गावातील वन कर्मचाऱ्यांना माहिती दिली. वन कर्मचारी सखाराम येणारे आणि योगेश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. हा हल्ला बिबट्यानेच केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. या प्रकारामुळे ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकरी गोरख मोरे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून वन विभागाने त्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी घोसपुरी ग्रामस्थांनी केली आहे. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे घोसपुरी परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पिंपळगाव उजैनी, खोसपुरी येथे एकाच दिवशी दोन बिबटे जेरबंद

नगर तालुक्यातील पिंपळगाव उजैनी आणि खोसपुरी शिवारात मागील अनेक महिन्यांपासून बिबट्याच्या वावरामुळे दहशतीत असलेल्या शेतकरी व नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. या २ गावच्या शिवारात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एकाच दिवशी १८ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास २ बिबटे जेरबंद झाले आहेत. बिबटे जेरबंद झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत सुटकेचा निःश्वास सोडला.



नगर तालुक्यातील खोसपुरी येथील डॉ. मोईन शेख यांच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झालेला बिबट्या.

खोसपुरी शिवारातील डॉ. मोईन शेख यांच्या शेतात मागील आठवड्यात वनविभागाच्या वतीने पिंजरा लावण्यात आला होता. बुधवारी सकाळी या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी संजय सरोदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर जेरबंद बिबट्याला सुरक्षितपणे वनविभागाच्या कार्यालयात हलविण्यात आले.

खोसपुरी, मजले चिंचोली, आव्हाडवाडी आणि उदरमल परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्याचा सातत्याने वावर होता. रात्रीच्या वेळी शेतात काम करताना तसेच पशुधनाची देखभाल करताना शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याकडून पाळीव प्राण्यांवर हल्ले होण्याच्या घटनाही वारंवार घडत होत्या. मागील आठवड्यात मजले चिंचोली येथील शेतकऱ्याच्या दहा शेळ्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांची शिकार केली होती. तर डॉ. मोईन शेख यांच्या शेतातील सुमारे २५ ते ३० कोंबड्यांवरही बिबट्याने हल्ला केला होता. या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये बिबट्याची भीती अधिकच वाढली होती. पाळीव प्राण्यांवरील हल्ले आणि बिबट्याच्या वारंवार होणाऱ्या दर्शनामुळे नागरिकांनी वनविभागाकडे बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. त्यानुसार खोसपुरी येथे पिंजरा लावण्यात आला आणि अखेर त्यात बिबट्या जेरबंद झाला.

पिंपळगाव उजैनी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढला होता. अनेक वेळा बिबट्या नागरिकांच्या निदर्शनास आल्याने शेतात काम करण्यासाठी जाणारे शेतकरी तसेच शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते. त्यामुळे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याचे १८ नोव्हेंबर रोजी सकाळी निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्राधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल नितीन गायकवाड, वनरक्षक मनेष जाधव, अशोक गाडेकर, विजय चेमटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनविभागाच्या पथकाने बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन कार्यालयात हलविले. बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अनेक दिवसांपासून बिबट्याच्या दहशतीखाली असलेल्या पिंपळगाव उजैनी परिसरातील ग्रामस्थांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

अहिल्यानगरमध्ये वनविभागाच्या पथकाला बिबट्याची हुलकावणी

नगर शहराजवळ छत्रपती संभाजीनगर रोडवर असलेल्या लष्कराच्या सीक्युएव्ही परिसरात असलेल्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे पथक जंगजंग पछाडत असून बिबट्या मात्र या पथकाला हुलकावणी देत आहे. वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यांची जागाही बदलली आहे. मात्र बिबट्याची हालचाल वेगवान असल्याने तसेच या परिसरात झाडी झुडपे मोठ्या प्रमाणावर असल्याने वनविभागाचे पथक हतबल झाले आहे. वनविभागाने जर जास्त मोठ्या प्रमाणात हालचाली करत बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न केला तर तो सीक्युएव्ही लगत असलेल्या सावेडी उपनगरातील लोकवस्तीत घुसण्याची शक्यता आहे. त्यामुळे वनविभाग सावधगिरीची भूमिका घेत असल्याचे वनपरिक्षेत्राधिकारी अविनाश तेलोरे यांनी सांगितले. दरम्यान, नगर शहर परिसराबरोबरच तालुक्यात अनेक गावांमध्ये बिबट्यांचा वावर आढळून येत आहे. त्यामुळे विविध गावातील ग्रामस्थांच्या मागणीनुसार वनविभागाने बिबट्यांना जेरबंद करण्यासाठी २५ ठिकाणी पिंजरे लावले असल्याचे वनविभागाच्यावतीने सांगण्यात आले.



गुरुवाणी - ११७

द्वेष भावना दूर करा...

धर्म ऐकूनही धार्मिक लोकांविषयी आपल्या मनातील द्वेष समाप्त होत नाही. कारण चिंतन केले जात नाही. राजा प्रदेशीसाठी त्याची प्रिय पत्नीच मारेकरी का ठरली? हे असं का झालं? त्याने कधी राणी सूर्यकांताला काही कमी पडू दिले नाही. तो फक्त धर्म मार्गावर निघाला होता. तरीही तिच्या मनात वैरभाव निर्माण झाला. सुधारणाऱ्या व्यक्तीचा द्वेष केला तर तुम्ही धर्मसंघाचे होऊ शकता का? आपल्या मनात राजा प्रदेशी प्रती आपला श्रद्धाभाव असतो. राणी सूर्यकांता विषयी राग असतो. जो दुष्ट नाही, ज्याने आपल्या जीवनात बदल केले आहेत, त्याचे खरे तर अभिनंदन केले पाहिजे. ज्याच्यावर आपले प्रेम असते त्याच्या विषयी आयुष्यात कधी तरी द्वेषाची भावना निर्माण होतेच. याला कर्म संबंध म्हणतात. लहान मुलांना तुम्ही जेव्हा रागावता तेव्हा ते तुम्हाला डिसलाईक करतात, फक्त व्यक्त होत नाही. पण त्यांच्या मनात ते असतेच. एका वयानंतर मुलं तुमच्या पासून दूर जातात. कारण त्यांच्या मनातील जुनी डिसलाईकची भावना असते. सूर्यकांता राणीच्या मनातही अशीच डिसलाईकची भावना कधी ना कधी निर्माण झाली होती. जी राजा प्रदेशीने आपला मार्ग बदलल्यानंतर उफाळून आली. लक्षात ठेवा, धर्म केवळ ऐकण्यासाठी नसतो तर पूर्ण समजून घेण्यासाठी असतो. खाल्लेले पचवले नाही तर आजार तयार होतात. त्याचाच परिणाम आहे की, धर्म आराधना करणारा धर्म आराधना करणाऱ्या दुसऱ्याचा तिरस्कार करतो. असे व्यक्ती कधीही धार्मिक होऊ शकत नाहीत. 'धर्मी धर्मीसे प्यार करता है, जो पापी का सत्कार करता है वह धर्मी नहीं होता.' मी गुरूदेवांच्या भूमीत कायम संघ एक करण्यासाठी प्रयत्न केले. मी कधीही राणी सूर्यकांता बनण्याच्या यात्रेचे अनुमोदन करणार नाही. विपरीत विचारांपासून कायम अलिप्त राहा. परिवारात कधी कोणामुळे दुखावले गेला असाल तर लगेच ते कायमचे विसरून जा. मनात ठेऊ नका. कॅन्सर सारखा आजार शेवटच्या स्टेजवर पोहचल्यावर कळतो. द्वेषरूपी कॅन्सर सुद्धा लवकर कळत नाही, जेव्हा शेवटच्या स्टेजला पोहोचतो तेव्हाच कळतो. त्याला आपल्या आत संग्रहीत होऊ देऊ नका. आता चातुर्मासात योगदान देणाऱ्यांविषयी बोलतो. नगरच्या केमिस्ट असोसिएशनने जिल्हास्तरीय जैन महासंमेलनासाठी पुढाकार घेत सुंदर नियोजन केले. सकल राजस्थानी संघ, बडीसाजन युवा संघ, जॉईज, सारसनगर युवा मंडळ सर्वांचे खूप खूप अभिनंदन. चातुर्मास काळात वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांचेही अभिनंदन.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

संपूर्ण राज्य गारठले; धुळे शहरात सर्वात कमी ६ अंश तर, नगर शहरात १३ अंश सेल्सिअस तापमान

नगर– शहरात हिवाळ्याची चाहूल अधिक तीव्र झाली असून पहाटे आणि रात्रीच्या वेळी चांगलाच गारवा जाणवत आहे. भारतीय हवामान विभागाच्या नोंदीनुसार २० नोव्हेंबर रोजी सकाळी किमान तापमान १३.७ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. दुपारी आकाश निरभ्र व सूर्यप्रकाश असतानाही थंडी जाणवत होती. रात्री पारा आणखी खाली येऊन थंडी आणखी वाढण्याची शक्यता आहे. ईशान्येकडून ताशी ६ ते १० किलोमीटर वेगाने थंड वारे वाहत असल्याने हवेत कोरडेपणा आणि गारवा जाणवत आहे. पुढील काही दिवस शहरात थंडी जाणवणार आहे. राज्यातील काही अपवाद वगळता सर्वच प्रमुख शहरांमध्ये १५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान होते. धुळे शहरात सर्वात कमी ६ अंश, जळगावमध्ये ८ अंश, नाशिक व पुणे शहरामध्ये १० अंश, छत्रपती संभाजीनगरमध्ये १२ अंश सेल्सिअस तापमान होते.

थंडीचा जोर आणखी वाढू शकतो. या बदलत्या हवामानामुळे आजारांचे प्रमाण वाढणार असून नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे. सकाळी नागरिक मॉर्निंग वॉकला जाताना गरम व उबदार कपड्यांचा वापर करत आहेत. ग्रामीण भागात शेकोट्याही पेटविल्या जात आहेत.

उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक थंडी

राज्यात सध्या थंडीचा कडाका वाढण्यामागे



उत्तर भारतातून येणारे थंड वारे आणि बंगालच्या उपसागरातील बदलती हवामान प्रणाली ही मुख्य कारणे आहेत. उत्तर भारतात तापमानात मोठी घट झाली असून तिकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील किमान तापमान २ ते ३ अंशांनी घसरले आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या चक्रीवादळ आणि कमी दाबाच्या प्रणालीमुळे वाऱ्यांच्या दिशेत बदल होऊन राज्यात गारठा वाढला आहे. राज्यातील अनेक भागांत पाऊस थांबून हवामान कोरडे झाले आहे. आकाश निरभ्र असल्याने रात्रीच्या वेळी जमिनीतील उष्णता वेगाने बाहेर पडते आणि पहाटे तीव्र गारवा जाणवतो. या हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम उत्तर महाराष्ट्र (धुळे, निफाड, जळगाव, नाशिक) आणि मराठवाड्यात जाणवत असून येथे किमान तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसपेक्षाही खाली आले आहे.

आला हिवाळा, आरोग्य सांभाळा

हिवाळ्यात मधुमेहाच्या रुग्णांनी आहारावर विशेष नियंत्रण ठेवावे, नियमित व्यायाम करावा आणि त्वचेची काळजी घ्यावी. थंडीच्या काळात रक्तदाबात चढ-उतार होऊ शकतात आणि हृदयावरील ताण वाढू शकतो, त्यामुळे रक्तदाब आणि हृदयरोगाच्या रुग्णांनी नियमित तपासणी करावी. वाढत्या थंडीत सर्दी, खोकला, ताप यांसारख्या मोसमी आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे शरीराला उष्ण ठेवणारे अन्नपदार्थ खावेत आणि कोमट पाणी प्यावे. कोरड्या हवामानामुळे त्वचा कोरडी पडणे किंवा फाटणे असे त्रास होतात, त्यासाठी मॉइश्चरायझरचा वापर करावा.

वेळीच निदान व योग्य उपचारांनी कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकतो

कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांचे जनजागृतीपर व्याख्यान



नगर – आताच्या काळात कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. या आजाराचे निदान लवकर झाले पाहिजे. सामान्य पेशींचे खूप जास्त प्रमाणात विभाजन होणे म्हणजे कॅन्सर. कॅन्सर कोणालाही होऊ शकतो. यात दोन गोष्टी असतात. यातील एक गोष्ट म्हणजे जेनेटिक्स, जे आपल्या हातात नसते. दुसरी गोष्ट ज्या बाहेरून आपण ग्रहण केलेल्या असतात. यासाठी चांगला पोषक आहार घेणे गरजेचे आहे. वाढते प्रदूषण सिगारेट ओढण्या इतकेच घातक आहे. संपूर्ण सेंद्रिय अन्न आपण खाऊ शकत नाही. पण दारू, सिगारेट, तंबाखूला आपण स्वतः नियंत्रणात ठेवू शकतो. यावर पूर्ण नियंत्रण आणले तरी ३० टक्के कॅन्सर आपण थांबवू शकतो, असे मार्गदर्शन पुणे येथील कॅन्सर सर्जन डॉ. भूषण भळगट यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पवित्र कर्मभूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास २०२६ होत आहे. याठिकाणी शुक्रवारी पुणे येथील कॅन्सर सर्जन डॉ. भूषण संजय भळगट यांचे कॅन्सर निदान व उपचार पद्धती या विषयावर जनजागृतीपर व्याख्यान झाले. उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या व्याख्याना प्रसंगी आमदार संग्राम जगताप, धनश्री विखे पाटील, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, केमिस्ट असोसिएशनचे नगरसेवक दत्ता गाडळकर, डॉ. संजय भळगट, डॉ. माधुरी भळगट, इंदौर येथील संतोषमामा जैन आदी उपस्थित होते.

प्रारंभी अशोक बोरा यांनी डॉ. भूषण भळगट यांचा परिचय करून देत स्वागत केले.

चातुर्मास कमिटीच्यावतीने उपाध्यक्ष अनिल पोखरणा यांनी डॉ.भळगट यांचा सत्कार केला.

मार्गदर्शन करताना डॉ. भळगट म्हणाले, एखादा तंबाखू खात नसला तरी त्याला कॅन्सर होऊ शकतो, याला जेनेटिक्स कारणीभूत असतात. अनेकांना वाटते कॅन्सर पूर्ण बरा होऊ शकत नाही. पण पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजचे कॅन्सर पूर्ण बरे होऊ शकतात. याचा अर्थ पूर्ण उपचारानंतर जो दहा वर्षे कॅन्सर मुक्त राहतो, तो बरा झाला असे समजावे. कॅन्सरची पहिल्या स्टेजमध्ये एकाच अवयवात असते. दुसऱ्या स्टेज मध्ये तो थोडा पसरतो. चौथ्या स्टेजमध्ये तो इतर अवयवात पसरलेला असतो. महिलांमध्ये स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते. आपल्याकडे पुरूषांमध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त असते. हे कॅन्सर पहिल्या स्टेज मध्येच ओळखले जाऊ शकतात. महिलांमध्ये मासिक पाळी जितकी कमी असते तितके स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण कमी असते. आजकाल लग्नाला विलंब, मूल लवकर न होऊ देणे अशा कारणांमुळे स्तनाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. गर्भ पिशवीच्या मुखाचा कॅन्सर इन्फेक्शनमुळे होतो. त्यावर आज प्रभावी लसीकरण उपलब्ध आहे. लठ्ठपणा, मधुमेह असेल तर गर्भ पिशवीचा कॅन्सर होण्याची शक्यता अधिक असते. तोंडाचा कॅन्सर तंबाखू न खाणाऱ्यांनाही होतो. दात धारदार असतील, दातांचे इंम्प्लांट ढिले असतील तरीही तोंडाचा कॅन्सर होऊ शकतो.

स्तनाच्या कॅन्सरची गाठ खूप कडक असते, वेगाने वाढणारी असते. स्वतः परीक्षण करून सुद्धा लक्षणे ओळखता येतात. मॅमोग्राफी तपासणीही वेळोवेळी केली पाहिजे. गर्भ पिशवीच्या कॅन्सर संदर्भात मेनोपॉजनंतर वेळोवेळी तपासणी करून घ्यावी. तोंडाच्या कॅन्सरसाठी अल्सरची तपासणी तज्ज्ञांमार्फत करावी. तोंडातील पांढऱ्या चट्ट्यांकडे, बरी न होणारी जखम याकडेही लक्ष दिले पाहिजे. कोणतीही जखम, गाठ नसताना स्क्रिनिंग केली पाहिजे. २१ वर्षांपुढील महिलांनी पॅपस्मीयर तपासणी ठराविक अंतराने करावी. लसीकरण भविष्यातील इन्फेक्शनचा प्रतिकार करण्यासाठी असते. कॅन्सर झाल्यावर लस घेऊन उपयोग नसतो. याचे कोणतेही साईड इफेक्ट नसतात.

कॅन्सरवर अनेक प्रभावी उपचार आहेत. सर्जरी, रेडिएशन, केमोथेरपी या उपचार पद्धती आहेत. प्रत्येक रुग्णाच्या कॅन्सरनुसार उपचार ठरवले जातात. केमोथेरपी नंतरही एखाद्या वेळी शस्त्रक्रिया करावी लागते. कारण गाठ मुळासकट काढावी लागते. आजच्या काळात स्तन वाचवण्याचे तंत्रज्ञान आहे. तोंडाच्या कॅन्सरमध्ये जबडा सुद्धा काढावा लागू शकतो. अनुवांशिकतेच्या कॅन्सरचे प्रमाण १० टक्केच असते. केमोथेरपी नंतर केसही पूर्ववत होऊ शकतात. पॅसिव्ह स्मोकिंग सुध्दा खूप घातक असते. तुमच्यामुळे तुम्ही घरच्यांना सुद्धा अडचणीत आणू शकता. त्यामुळे योग्य काळजी आणि नियमित वैद्यकीय तपासणी केली पाहिजे.



जागतिक बालदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वप्नांना बळ देऊया...! या अभिनव श्रुतनाटिकेचे ध्वनिमुद्रण आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावर नुकतेच पार पडले.

विद्यार्थ्यांचा २१ नोव्हेंबर रोजी आकाशवाणीवरून जागर

नगर – जागतिक बालदिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वप्नांना बळ देऊया...! या अभिनव श्रुतनाटिकेचे ध्वनिमुद्रण आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावर पार पडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कल्पकतेला आणि अभिव्यक्तीला आकाशवाणीसारख्या माध्यमातून व्यासपीठ मिळणार असून, ही श्रुतनाटिका २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.४० वाजता आकाशवाणी अहिल्यानगर केंद्राच्या लोकजागर या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे.

यंदाच्या जागतिक बालदिनाची माझा दिवस, माझे हक्क, माझे भविष्य ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून या श्रुतनाटिकेची निर्मिती करण्यात आली आहे. बालकांचे हक्क, त्यांचे भावविश्व, स्वप्ने, आकांक्षा, शिक्षणातील समान संधी आणि सुरक्षित बालपण या महत्त्वपूर्ण विषयांना कवितांच्या, गीतांच्या आणि प्रभावी निवेदनाच्या माध्यमातून स्पर्श करण्यात आला आहे. प्रत्येक बालकाला स्वतःची स्वप्ने पाहण्याचा, ती व्यक्त करण्याचा आणि ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी समान संधी मिळण्याचा अधिकार आहे, हा या संपूर्ण सादरीकरणाचा मूलभूत विचार आहे.

आकाशवाणी अहिल्यानगरचे कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे यांनी या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक नारायण मंगलारम आणि उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर चेडे यांनी श्रुतनाटिकेचे संकल्पनात्मक नियोजन, लेखन, विद्यार्थ्यांची तयारी आणि सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली.

या श्रुतनाटिकेत प्रिया कदम, आरोही मते, कावेरी पटारे, शंभू चांदणे, रुचिता कदम, कृत्तिका पटारे, आकांक्षा निकम, सम्राट चांदणे, प्रिया गोलवड, श्रवणी चांदणे, अक्षरा चांदणे, आकांक्षा चांदणे, आरोही चांदणे, स्वामी कदम आणि श्रीनाथ हिलगुडे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे.

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व चोरीविरोधात प्रशासनाची धडक मोहीम; २ दिवसांत संगमनेर, राहुरी, पारनेर व घारगावात ५ स्वतंत्र गुन्हे दाखल

नगर – जिल्ह्यातील विविध भागांत नदीपात्रांतून बेकायदेशीररीत्या वाळूचे उत्खनन, साठवणूक आणि चोरीची वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी तसेच महसूल विभागाने धडक कारवाईची मोहीम उघडली आहे. गेल्या २ दिवसांत संगमनेर तालुका, संगमनेर शहर, राहुरी, पारनेर आणि घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या पाच स्वतंत्र घटनांमध्ये वाळूसह टेम्पो, डंपर आणि ट्रॅक्टर असा लाखोंचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निमज येथील फॉरेस्ट गट नंबर ३९ मध्ये दिनांक १७ नोव्हेंबर रोजी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास कारवाई करत प्रशासनाने अंदाजे १२ हजार रुपये किमतीचा २० ब्रास वाळूचा साठा जप्त केला. प्रवरा नदीपात्रातील अवैध वाळूचे उत्खनन करून चोरीची वाहतूक व साठवणूक केल्याप्रकरणी चैतन्य उर्फ चेतन सूर्यभान साळुंखे (रा. निमज, ता. संगमनेर) याच्याविरुद्ध धोंडीबा बुधा भालचिम (वय ५७ वर्षे, रा. देवाचा मळा, संगमनेर) यांच्या फिर्यादीवरून १८ नोव्हेंबर रोजी दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या घटनेत संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संगमनेर खुर्द व संगमनेर बुद्रुक येथील प्रवरा नदीपात्रात १६ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास अवैध वाळू चोरीची कारवाई उघडकीस आली. याठिकाणी जेसीबीच्या साहाय्याने पिकअपमध्ये वाळू भरून विनापरवाना चोरटी वाहतूक करताना एकूण १८० ब्रास वाळूचा साठा (किंमत ५ लाख ४० हजार रुपये) जप्त करण्यात आला. या प्रकरणी मंडळाधिकारी विश्वजित वसंतराव चौगले (वय ४१ वर्षे, रा. साकुर, ता.संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी इरफान शेख (वय ३६ वर्षे), सैफ खान (वय ३२ वर्षे), मोईन शेख (वय ३८ वर्षे), अरबाज शेख (वय ३० वर्षे), शहाबाज खान (वय ३२ वर्षे), सोहेल मनियार (वय २८ वर्षे), जावेद शेख (वय ४४ वर्षे) आणि अकिल नजीरखान पठाण (वय ५३ वर्षे, सर्व रा. संगमनेर परिसर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोल्हार खुर्द येथील बर्डे वस्ती परिसरात १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.४० वाजण्याच्या सुमारास विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करताना एक विना क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा अशोका लेलँड टेम्पो व त्यातील १ ब्रास वाळू असा एकूण ११ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस कॉन्स्टेबल रणजित पोपट जाधव (वय ३६ वर्षे) यांच्या फिर्यादीवरून जालिंदर राजेंद्र लकारिया (वय २८ वर्षे), अक्षय सुनील लकारिया (वय २६ वर्षे) आणि अजय रणजित लकारिया (वय २६ वर्षे, तिघेही रा. कोल्हार खुर्द, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर तालुक्यातील पोखरी गावच्या शिवारात १८ नोव्हेंबररोजी पहाटे ५.२५ वाजण्याच्या सुमारास कारवाई करून पोलिसांनी विना क्रमांकाचा टाटा कंपनीचा डंपर व त्यातील वाळू असा एकूण १५ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. डंपरमध्ये वाळू चोरून भरून विनापरवाना वाहतूक केल्याप्रकरणी नवनाथ रघुनाथ ढोकळे (वय ४० वर्षे, रा. खडकवाडी, ता. पारनेर) याच्याविरुद्ध पोलीस कॉन्स्टेबल गणेश डोंगरे (वय २६ वर्षे) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साकुर चौफुलीजवळ साकुर-मांडवे रस्त्यावर साई फॅब्रिकेशनसमोर, साकुर (ता. संगमनेर) येथे १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास कारवाई करत पोलिसांनी विना क्रमांकाचा लाल रंगाचा महिंद्रा ५७५ डीआय मॉडेलचा जुना ट्रॅक्टर व ट्रॉलीतील अर्धा ब्रास वाळू (किंमत ३ हजार रुपये) असा एकूण ५ लाख ३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी सोमनाथ नाना शेरमाळे (वय ३९ वर्षे, रा. समनापूर, ता. संगमनेर) यांच्या फिर्यादीवरून अमित रावसाहेब कांबळे (वय २८ वर्षे, रा. कांबळे वस्ती, साकुर, ता. संगमनेर) आणि अजहर रफिक पटेल (रा. साकुर, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

2BHK फ्लॅट भाड्याने देणे

आर्यन गार्डन, बालिकाश्रम रोड येथे

अमेय स्कीन

मुनोत इस्टेट, स्वस्तीक चौक, अ. नगर

9822309434
9822584723

विकणे आहे

शिंप्पी गल्ली तेलीखुंट, कापड बाजारजवळ असलेली

४१० स्क्वे. फुट जागा विकणे आहे.

8010150186

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME "SHAIKH NAVID AAZIZ" TO NEW NAME "NAVID ABDUL AZIZ SHAIKH"
UID NO. 503022997926

पाहिजेत

रजिस्टर्ड

फार्मासिस्ट

(जागा- २, स्त्री)

9823787910

पाहिजेत

Msc Biology/ Microbiology
(जागा -०१)

Bsc Nursing
(जागा -०२)

पंडित हॉस्पिटल
कोठी रोड, अहिल्यानगर

8847731240
8446676464

श्री यशराज मार्केटींग, बुरुडगल्ली या कॉस्मेटीक दुकानासाठी पाहिजेत

कॉम्प्युटर ऑपरेटर -१
(महिला)

मुले -२

9860040002

WANTED Engineers

B.E./Diploma,
(civil, computer)

CONTACT

9284110220
9604724295

एजन्सी मध्ये मालवाहतूक गाडी TATA ACE साठी ड्रायव्हर पाहिजे

हिंदुत्व चौक, तपोवन रोड, अहिल्यानगर

9373340163

अॅम्ब्युलन्स विकणे

MODEL-EECO
अॅम्ब्युलन्स २०२४

योग्य किंमत आल्यास विकणे

काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशन. अहिल्यानगर.

9421810350
9877542044

विकणे/ भाड्याने देणे

सारसनगर येथे नवीन

3BHK
बंगला विकणे आहे

2BHK
फ्लॅट भाड्याने आहे

9604914748

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

स्टोअर विभाग

- बाजार भावाबाबत कोटेशन दरपत्रक सुचना - स्टोअर विभाग जा.क्र.- २५४

दि. १९/११/२०२६ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका सार्व.उद्यान विभागा करिता आवश्यक असलेले १) Mera 71-1800 pkt x 100gm व 2)Glycel Liquid 50 Jar x 5 ltr. इ.साहित्य खरेदीकामी दरपत्रके मागविणेसाठी amc.gov.in या मनपा वेबसाईटवर व नोटीस बोर्डवर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी त्वरित पाहिजेत

सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव

कॅशिअर-०४

(आकर्षक पगार) -अर्जासाठ रामक्षा भेटा -

Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar

7887395983

पाहिजे रिसेप्शनिस्ट पाहिजे

(जागा १)

आयुर्वेदा लाकडी घाणा
गंधेमळा बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर

9422224409
9422221146

पाहिजेत

नामांकित कंपनी

हॅप्पी मेडिकेअर

सावेडी, अहिल्यानगर येथे नामांकित कंपनीत ऑफिस कामासाठी मुली व मुले पाहिजेत.
शिक्षण -१२ वी पास व पदवीधर,
वयोमर्यादा १९ ते ३० पर्यंत

संपर्क
9172194775
8459809981

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत

* कारागीर - ४
* हेल्पर - ६

प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर

9822499210
9657646555

पाहिजेत

* सेल्स एक्झिक्युटिव्ह

(MBA PERFARABLE) (पुरुष -२, महिला ३)

सोबत तुमचा बायोडाटा (Resume) घेऊन या.
मुलाखतीची तारिख - २३ व २४ नोव्हेंबर.२०२६ वेळ - दुपारी ३ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

इन्स्पायर कॉम्प्युटर्स | तेलीखुंट, कुंदन सर्जिकलच्या जवळ, अहिल्यानगर-414001, Mo : 7483396080

नामांकित कंपनीसाठी पाहिजेत

सेल्स ऑफिसर : ०४ जागा
कमीतकमी १ वर्षाचा अनुभव आवश्यक/
उत्तम संभाषण, मराठी, इंग्रजीचे ज्ञान आवश्यक, टू-व्हिलर येणे आवश्यक

अकौंटंट : ०४ जागा
टॅलीचे ज्ञान आवश्यक, २ ते ३ वर्षाचा अनुभव अवश्यक

श्रीजी डिस्ट्रीब्युटर ऑफिस नं. २०२, स्क्वेअर सेंटर, प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, अ.नगर.
Mo. 9168628167 / 9823042605



थंडीचे कपडे...

जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...

स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्रग व

अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल **मयुरी लेडिज मॉल**

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०१९८८

डॉ पानसरे चेस्ट हॉस्पिटल

तारकपूर बस स्टॅण्डसमोर, अहिल्यानगर

जागतिक COPD दिवस

श्वास घ्या मोकळेपणाने, उज्ज्वल आनंदाने!

18 नोव्हेंबर 2026 पासून 24 नोव्हेंबरपर्यंत

PFT टेस्ट मोफत

COPD ची मुख्य कारणे?
COPD (Chronic Obstructive Pulmonary Disease) ही एक फुफ्फुसाची दीर्घकालीन आजार आहे ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होतो.

लवकर तपासणी का महत्वाची?

लक्षणे
* दम लागणे
* सतत खोकला
* कफ होणे
* छातीत घरघर
* थकवा येणे
* जास्त श्रमाने श्वास घ्यायला त्रास

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी आजच संपर्क करा | मो : 9028212225

श्वास घ्या मोकळेपणाने...तपासणी करा वेळेवर...आरोग्य ठेवा उत्तम!

उत्तम प्रतिष्ठेच्या नोकरीची सुवर्ण व्यवसायामध्ये आपणांस संधी



कॅशिअर - 4 जागा
2 ते 3 वर्षाचा अनुभव आवश्यक

सेल्स रिप्रेझिन्टिव्ह - 8 जागा
मराठी, हिंदी भाषेवर प्रभुत्व, उत्तम संभाषण कौशल्य, सराफी पेढीत काम करण्याचा अनुभव किंवा विना अनुभवींना सुद्धा प्राधान्य.

हेल्पर - 6 जागा

स्थापना 1937 नेवासा, अहिल्यानगर
S.G.K. एस.जी.कायगांवकर JEWELLERS

वेळ : सायं 4-6 | बुधवार बंद

सावेडी 9511902345

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांयरोयर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालु आहे. सदर मिळकतीयर चोलामंडलम इनव्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लि या वित्तीय संस्थेचे कर्ज आहे त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही वित्तीय संस्थेचा बोजा नाही असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. खरेदीखतापूर्वी कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा कोणचेही आर्थिक देणे अगर बोजा, दान, वक्षीसपत्र, अव्वल जमी, इतर बँकेचा बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २०/११/२०२६

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन :जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील मौजे निंबळक येथील खालील वर्णनाची जिरायत शेतजमिन मिळकत -

गट नंबर	क्षेत्रफळ हे.आर	आकार रु. पै.
३६२/१	९.२८.	२९.२८

यापैकी दक्षिणेकडील शिव रस्त्यास लागुन असलेले मध्यभागावे १ हे. २० आर क्षेत्र

यासी चतुःसीमा -

पूर्वेस : गट नंबर ३६२/१ पैकी क्षेत्र
दक्षिणेस : शिव रस्ता (मौजे नेप्तीची शीव)
पश्चिमेस : गट नंबर ३६२/१ पैकी क्षेत्र
उत्तरेस : गट नंबर ३६२/१ पैकी क्षेत्र

विद्यमान मालकांचे नाव-

श्री. चिंतामण गालचंद्र कुलकर्णी,
सौ. गौरी चिंतामण कुलकर्णी.

दोघे रा. चिंतामणी हॉस्पीटल, गोंदबळेकर महाराज मंदीराजवळ, बालिकाश्रम रोड, सावेडी, अहिल्यानगर -४१४००३.

ॲड. आर. टी. शर्मा
ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया)
पत्ता- ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर, मो. ९४२२२२०८४५,



जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **योगीता अशोक चोभे रा.वाघलुज, ता.आष्टी, जि.बीड** यांच्या मालकी वहिवाटीची असून, सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांयरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन:- जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील मौजे नागरदेवळे येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सर्व्हे नं. २३२/१ब/२ब/२अ/२ चे क्षेत्र ०हे ९५.१७ आर याचे आकार ०रु ७१ पैसे यापैकी विद्यमान मालक यांच्या खरेदी मालकीची संपुर्ण ०हे २आर जमिन मिळकतीबाबत.

यासी चतुःसिमा-

पुर्वेस - अंतर्गत रस्ता, दक्षिणेस - सर्व्हे नं. पैकी
पश्चिमेस - सर्व्हे नं. पैकी उत्तरेस - शेख शमशुद्दीन युसूफ यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

ॲड. तनवीर एम.शेख नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड. फरहान आसिफ शेख
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/ ९७६६१४५९३२

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. अन्वर नजीर शेख रा. शुक्रवार बाजार, शनी मंदिरासमोर, भिंगार, अहिल्यानगर (अहमदनगर) २. समिना आसिफ शेख रा. दादा गॅरेज समोर, श्याग फरसान लाईन, रागवाडी, सर्जेपुरा, अहिल्यानगर (अहमदनगर)** यांच्या मालकी वहिवाटीची असून, सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांयरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन:- जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील मौजे नागरदेवळे येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सर्व्हे नं. २३२/१ब/२ब/२अ/२ चे क्षेत्र ०हे ९५.१७ आर याचे आकार ०रु ७१ पैसे यापैकी विद्यमान मालकांच्या खरेदी मालकीची सामाईकातील अविभक्त हिश्याची संपुर्ण ०हे १ आर जमिन मिळकतीबाबत.

यासी चतुःसिमा-

पुर्वेस - अंतर्गत १० फुट रुंदीचा रस्ता व सर्व्हे नं. पैकी लहानु तुळशीराम पाखरे यांची जमिन
दक्षिणेस - सर्व्हे नं. पैकी नोमान साजिद काझी यांची जमिन
पश्चिमेस - सर्व्हे नं. पैकी उत्तरेस - लक्ष्मीबाई पाखरे यांची जमिन

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता. दि. २०/११/२०२६

ॲड. तनवीर एम.शेख नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड. फरहान आसिफ शेख
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/ ९७६६१४५९३२

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **सोमनाथ भानुदास बांगर, केतन संभाजी बांगर, किरण भानुदास बांगर व कचरु अंबादास बांगर सर्व रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. त्याअन्वये विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी बोलणी केली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, वक्षीस पत्र, मनाई हुकम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह. खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :-

डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे नागापूर येथील शेत जमिनीचा सर्व्हे नं. ११/४ हिस्सा नं. ३ (जुना सर्व्हे नं. ८/४) याचे क्षेत्र ०हे. २६.३० आर. + पो.ख. ०हे.०१.२०आर. असे एकुण क्षेत्र ०हे. २७.५०आर. याचा आकार १रु.१२पैसे. यापैकी विद्यमान मालक सोमनाथ भानुदास बांगर, केतन संभाजी बांगर व किरण भानुदास बांगर यांचे मालकीचे क्षेत्र ०हे १७.८०आर. व विद्यमान मालक कचरु अंबादास बांगर यांचे मालकीचे ०हे. ०८.५०आर. असे एकूण क्षेत्र ०हे. २६.३०आर. + पो.ख. ०हे. ०१.२० आर. याचा आकार ० रु. ७६पै. संपूर्ण मिळकत.

यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वी :- सर्व्हे नं.११/५ पैकी, दक्षिण :- एम आय डी सी.,
पश्चिम :- सर्व्हे नं. ११/३, उत्तर :- सर्व्हे नं.११/४/२,

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कसह वरील मिळकत.

अहिल्यानगर, दिनांक - २०/११/२०२६

ॲड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस- महालक्ष्मी चेंबर्स, मोरया मंगल कार्यालयासमोर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. नं. ८२०८१५४०२६

बाळ आजारी आहे का?



- ते वारंवार आजारी असणे
- नेहमी सर्दी, खोकला
- वारंवार होणारा बाल दमा
- वारंवार जुलाब होणे
- प्रतिकारशक्ती कमी असणे
- वजन, उंची कमी

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

संपर्क : मो. ९५१११११०४४४
डॉ.अनिरुद्ध गिते MBBS / MD paeds

अक्षय मुलांचे हॉस्पिटल बालिकाश्रम रोड, अ.नगर

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती ह्या विद्यमान मालक **डॉ. रागिणी राजेश पाटील रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकती आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली .असुन सदर मिळकती लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, वक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे बुऱ्हाणनगर येथील सर्व्हे नं. ३६/१ मधील प्लॉट मिळकती खालीलप्रमाणे :-

प्लॉट नं.	क्षेत्रफळ चौ. मी.	चतुःसिमा			
		पुर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
३	१४९.९१	प्लॉट नं.२६	१२ मी.रस्ता	९ मी. रस्ता	प्लॉटनं. ४
४	१२८.८३	प्लॉट नं.२५	प्लॉट नं. ३	९ मी. रस्ता	प्लॉटनं. ५

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक संपूर्ण प्लॉटस् व तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.


अहिल्यानगर, दि. २०/११/२०२६

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ॲड. ओंकार पंडीत गोरे
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे

दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



SCREEN - 1
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)

रामायण

SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)

ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 बंधू (मराठी)



09.00 PM 200/- (2D)



06.00 PM 150/-

आशा कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 20 ते २६ नोव्हेंबर 2026

मैत्रेय (मराठी) 12:30 PM

बंधू (मराठी) 01:45 PM

जिजाई (मराठी) 04:45 PM

आधी अनंत (मराठी) 06:45 PM

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

CONNPLEX SMART THEATRE

AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001